Sangamner ▮ MAHMAR/2018/75654 ▮ वर्ष ८ ▮ अंक १९५ ▮ १४/१२/२०२५ (दैनिक) ▮ किंमत रु.२/- ▮ पाने ८

बांधिलकी जनहिताची...

# नायक

सायं. दैनिक

सुखाचा आरंभ

## लग्नसराई विशेषांक









सुविचार : आपले काम म्हणजे आपल्या कुवतीचे आणि बुद्धीचे प्रदर्शन होय. – एडवर्ड गिबन

## इतिहासाच्या सावल्या

मतचोरी आणि एसआयआरच्या मुद्द्यावर संसदेत चर्चा झाली. टोकदार आरोप विरोधी पक्षनेत्यांकडून केले गेले. सत्ताधार्यांनी त्याला त्यापेक्षा अधिक टोकदार प्रत्युत्तर दिले. वर्तमानातील स्थितीबाबत सुरू झालेली ही चर्चा पाऊण शतक मागे गेली. भूतकाळात जाणे प्रत्येक वेळी वाईट नसते, मात्र काही वेळा तेव्हाच्या घटना कुठेतरी आपल्यालाच निरूत्तर करत असतात. याची दक्षता घेताना आता मतचोरीचा मुद्दा रेटून कुठपर्यंत रेटायचा याचा विरोधी पक्षाला विचार करावा लागणार आहे. त्याचे कारण प्रत्येक विषय जर शेवटी इतिहास आणि घराण्यापर्यंतच नेला जाणार असेल तर त्यांच्या मुद्द्यातील गांभीर्य यातच हरवून जाते आणि आजच्या स्थितीत नागरिकांना विरोधी पक्षांकडून काय अपेक्षा आहे ते मिळण्यात विलंब किंवा अपेक्षाभंगच होणार असेल तर विरोधी पक्षाचीच ही दुहेरी कोंडी ठरेल. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा संसदेत सक्षमपणे मांडला. त्यांना पक्षातील आणि विरोधी आघाडीतील अन्य काही नेत्यांची सुसंगत साथ मिळाली. सरकारच्या बाजूने गृहमंत्री अमित शहा यांनी उत्तर दिले. त्यांनी १९५२ पासून सुरुवात केली. त्याच्याही अगोदरचे एक उदाहरण देत त्यांनी मतचोरीचा मुद्दा उद्धृत करण्याचा प्रयत्न केला. राहुल यांचा आरोप असलेली मतचोरी शहांनी मतचोरीच्या संदर्भात दिलेल्या तीन उदाहरणांमुळे वेगळ्याच दिशेने गेली. विरोधक त्यांचे काम करत आहेत व त्यांनी ते करावेच; तथापि, आता आपण ज्या इतिहासातील दाखले त्यांना दिले जात आहेत तेथूनच पुन्हा नव्याने सुरुवात करावी का याचाही जरूर विचार करावा. जेव्हा एखादे दार उघडणारच नसेल तर वेगळे पर्याय हाताळून मार्ग तयार करावा लागतो. ती संधी अजूनही विरोधकांकडे आहे.

एका निवडणुकीतील पराभवामुळे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सर्व विरोधी पक्ष एकतर अज्ञातवासात जातात किंवा त्याच आरोपांची मालिका कायम ठेवतात. भारतीय जनता पार्टी मात्र विजयी झाल्यावरही गाफील राहत नाही, हे त्यांचे बलस्थान आहे. दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि बिहार या प्रत्येक निवडणुकीत हेच दिसले. मतचोरी आणि ईव्हीएमकडे बोट दाखवताना आपल्या त्रुटीही ध्यानात घेणे आवश्यक. बिहारच्या विजयानंतर भाजप पुढच्या आसाम, बंगाल, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुकांच्या तयारीलाही लागला आहे. विरोधक अजूनही हरियाणाच्या निकालापाशीच थांबलेले दिसतात. विरोधी आघाडीतील प्रमुख नेते एकांड्या शिलेदारासारखे लढत आहेत. तेही असे शिलेदार आहेत ज्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप आहे. त्या आरोपातच त्यांना गुरफटून ठेवल्यावर तेच होते जे बिहारमध्ये तेजस्वी यादव यांचे झाले. जंगलराजच्या इतिहासातून त्यांना बाहेर पडताच आले नाही. बदल घडवला तो फक्त झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन यांनी. घराणेशाही आणि इतिहासातील घोटाळ्यांचा बोजा त्यांच्यावरही होता, तथापि, त्यांनी वेळीच भाजपचीच राज्ये असलेल्या मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि हरियाणातील महिला वर्गाला आकर्षित करणार्या योजनांचा अभ्यास करून त्या आपल्या राज्यात राबवल्या. असे करून केवळ सत्ता राखलीच नाही तर मागच्या वेळेपेक्षा जास्त जागाही जिंकल्या. भारतीय राजकारणातील सध्याची अवस्था पाहता मोठा बदल सर्वच स्तरावर होणे अपेक्षित आहे. विरोधकांना द्विधा अवस्थेत न राहता पूर्ण वेळ राजकारण करावे लागणार आहे.निवडणुकीच्या उत्सवापुरती सक्रियता सोडून पूर्णत: झोकून काम करावे लागेल. नेता सतत उपलब्ध आहे आणि आपल्यासोबतच आहे हा विश्वास जेव्हा कार्यकर्त्यांच्या मनात जागतो तेव्हा त्या पक्षसंघटनेत चैतन्य असते. ऐनवेळी प्रकट व्हायचे आणि मतदान झाल्यावर गायब व्हायचे ही बदलत्या राजकारणाला न मानवणारी पद्धती सोडावी लागेल. दशकभरात झालेल्या निवडणुका आणि त्यात मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा ट्रेंड पाहता मतदार मनाशी खूणगाठ बांधून मतदान करत असल्याचे दिसते. रेवडीच्या राजकारणाचा काही भाग असला तरी मतदारासाठी त्याच्या गरजा, आशा–अपेक्षा महत्त्वाच्या आहेत. त्या इतक्या महत्त्वाच्या आहेत की जाती–पातीच्या विभागणीच्या पलिकडे जाऊन स्वत:चा विचार तो करतो आहे. मतदाराला गोंधळ, गदारोळ, आरोप आणि इतिहासाची चर्चा आणि दाखले नको आहेत.त्याला समस्या आणि प्रश्नही नको आहेत तर त्यावर उत्तर देणारे आणि समस्या सोडवणारे हवे आहेत. विरोधकांना वेगळे उपचार करावे लागतील आणि गरज पडल्यास आंदोलनाचा मार्गही पत्करावा लागेल. तेही प्रतिकात्मक आणि सोशल मीडियावरील फोटोपुरते मर्यादित न राहता जनमानस चाळवणारे हवे. मुद्द्यांवर हवे आणि मतदाराच्या भविष्यातील आकांक्षांशी निगडीत हवे. तेजस्वी यादव यांना बिहारच्या इतिहासात, उद्धव ठाकरेंना महाराष्ट्राच्या इतिहासात आणि राहुल गांधी यांना त्यांच्या पक्षाच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात अशा असंख्य आंदोलनांचे दाखले मिळतील. अखिलेश यादव यांनाही उत्तर प्रदेशातील पारंपरिक समीकरणांना छेद देत नवे गणित मांडावे लागेल. आजच्या राजकीय वातावरणात केवळ मुद्दे उचलून धरून चालणार नाही, तर त्या मुद्द्यांभोवती विश्वास निर्माण करणारी सातत्यपूर्ण राजकीय उपस्थितीही दाखवावी लागेल. विरोधकांनी मतचोरीसारख्या गंभीर प्रश्नांचा वापर केवळ आरोपांसाठी केला तर ते स्वतःच आपल्या भूमिकेचे हलकेपण अधोरेखित करतील. कोणत्या विषयाला किती वाव द्यायचा आणि कुठे नवा मार्ग पकडायचा याचे भान ठेवणे आता अनिवार्य झाले आहे. नागरिकांचे प्रश्न रोज बदलत आहेत, त्यांच्या प्रमुख चिंता महागाई, सुरक्षा, रोजगार आणि स्थानिक पातळीवरील मूलभूत सुविधांभोवती फिरत आहेत. या सर्वांचे उत्तर देणारा, उपाय शोधणारा आणि त्या उपायांची अंमलबजावणी करण्याची इच्छाशक्ती दाखवणारा पर्याय विरोधकांनी स्वत:मध्येच घडवावा लागेल. अन्यथा इतिहासाचे ओझे, आरोपांचे वलय आणि घराणेशाहीच्या सावल्या यांतच ते अडकून राहतील.भारतीय राजकारणाची दिशा आता वेगाने बदलत आहे. मतदार प्रदेशनिष्ठेहून पुढे जाऊन कार्यक्षमतेकडे पाहू लागला आहे. विकासाचा ठोस आराखडा, शासनाची जवाबदारी आणि नेत्यांची प्रत्यक्ष उपस्थिती या तिन्ही बाबींवर जनतेचा भर आहे. विरोधी पक्षांनी या नव्या राजकीय वास्तवाची जाणीव करून घेत पुढील काही वर्षे सजग, सातत्यपूर्ण आणि कृतीप्रधान राजकारण करणे हीच काळाची गरज आहे. ■

---

> **भारतातील ७० कोटी लोक वेळ, मेंदू आणि डेटा खर्च करून सोशल मीडिया चालवत आहेत; पण या महासमुदायाच्या कमाईचा खरा आनंद परदेशस्थ मिळवत आहेत. जग म्हणते भारत डिजिटल बाजाराचा राजा बनला आहे, पण प्रत्यक्षात हा बाजार भारतीयांपासून कमाई करून अब्जावधी रुपयांचे विदेशी ट्रान्सफर करत आहे. मार्क झुकरबर्गच्या ‘मेटा’चे एकट्याचे भारतातून वार्षिक उत्पन्न १८–२० हजार कोटी रुपये आहे आणि भारतीय क्रिएटर्सना देण्याच्या नावाखाली त्यांच्या खिशातातून जातो मोठ्ठा भोपळा ! ब्रँड डील्स आणि प्रमोशनचा थोडाफार पैसा मिळतोही, पण त्यातील ७० टक्के टॉप–१ क्रिएटर्सकडे जातात. उरलेल्या ९९ टक्क्यांच्या वाट्याला येते लाईक्सची नशा, फॉलोअर्सची भ्रमितावस्था आणि व्हायरल होण्याची अपूर्ण आशा. यातील शोकांतिका अशी की, या बाजारात लाखो जण आपण ‘फेमस’ होत आहोत या आनंदात मश्गूल आहेत आणि कोट्यवधी जण त्यांना पाहण्यात अमूल्य वेळ वाया घालवत आहेत.**

## कमाई ‘विदेशींची’, भ्रमितावस्था ‘स्वदेशीं’ची




■ **योगेश मिश्र**, ज्येष्ठ विश्लेषक, स्तंभलेखक

मानव सुरुवातीपासूनच संवाद साधण्याचे नवे मार्ग शोधत आला आहे. कालोघात संवादाचे प्रारूप बदलत गेले. गुफांमध्ये चित्रे काढणे, बोलणे, चिठ्ठ्या लिहिणे, सांकेतिक भाषा वापरणे, ईमेल पाठवणे असा हा प्रवास सुरू असतानाच नव्वदीच्या दशकामध्ये संगणक आले आणि त्यानंतर इंटरनेटचे आगमन झाले. यामुळे संवादाची प्रक्रिया काही अंशी बदलली. त्यानंतर आला सोशल मीडिया. समाजमाध्यमांवर सुरुवातीला सगळे फक्त चॅटिंगपुरतेच मर्यादित होते. पण २००४ मध्ये फेसबुक, त्यानंतर ट्विटरसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्स आल्या आणि सोशल मीडियाने जणू रॉकेटची गती पकडली. ती इतकी वेगवान झाली की आज जगातील जवळपास पाच अब्ज लोक कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सोशल मीडिया वापरत आहेत.

हा विस्तार जितका सुपरफास्ट आणि प्रचंड वेगाने बदलणारा होता, तितकीच त्याची पकडही जबरदस्त होती. जगातील सर्वाधिक व्यसन लावणाऱ्या गोष्टींशी तुलना करण्यासारखी ही पकड मजबूत ठरली. मुले–मुली, स्त्री–पुरुष, वृद्धह्नयापैकी कोणीही या पकडीतून बचाव करू शकले नाही. नशा किंवा व्यसन हे असेच असते. अवघ्या दोन दशकांत या व्यसनाचे व्यसनाधिनतेत रुपांतर झाले. परिणामी आज अनेक देश सोशल मीडियावर निर्बंध घालू लागले आहेत. सुरुवात मुलांपासून केली जात आहे, जेणेकरून ते लहान वयातच या व्यसनात अडकू नयेत. ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदी लागू केली आहे. तिकडे मलेशिया पुढच्या वर्षी असाच निर्णय अमलात आणणार आहे. प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या युरोपियन युनियनमध्येही अशा बंदीचा प्रस्ताव आला आहे. संपूर्ण जगात याबाबतीत पुढे असलेला चीन तर आधीपासूनच कडक बंदी लावून बसला आहे. कारण एकच. प्रत्येकाला चिंता आहे आपल्या मुलांची आणि देशाच्या भविष्याची. कारण सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकून देशाचे कर्णधारच जर मानसिकदृष्ट्या कमजोर झाले, आजारी पडले, भ्रमित झाले किंवा त्यांची विचारसरणीच बदलली तर नंतर राष्ट्राचे काय होणार?

लांब कशाला जायचे? आपल्या आसपासचे वातावरण पाहिले तरी सहजगत्या याची कल्पना येते. भवताली नजर टाकून पहा सर्व जण आज मोबाईलच्या स्क्रिनमध्ये गढून गेलेले दिसतात. ते पाहिल्यानंतर थोडे स्वतःचेही आत्मपरीक्षण करा. बोलणे किंवा संवाद साधणे हे आता फोनचे ‘एक्स्ट्रा फीचर’ झाले आहे; मूळ काम झाले आहे स्क्रोलिंग. बाथरूमपासून प्रवासापर्यंत आणि ऑफिसपासून बेडरूमपर्यंत प्रत्येक जण स्क्रोलिंग करताना दिसतो. दुर्दैवाची बाब म्हणजे यापैकी कुणालाच आपण काय शोधत आहेत याची कल्पना नाहीये ! पण तरीही स्क्रोलिंग अव्याहत सुरू आहे.

याहून मजेशीर म्हणजे जेन झेड म्हणवली जाणारी आजची संपूर्ण पिढी रील्स बनवण्यात व्यस्त आहे. मुलं–मुलीच कशाला सासवा–सुना, आई–मुलगी अशा टीम्स बनवून ट्रेंडिंग ऑडिओवर डान्स करत आहेत. रील्स संस्कृतीने सामाजिक वर्तनही उलटेपालटे करून टाले आहे. लोक वाटेत अनोळखी व्यक्तींसमोर डान्स करतात, पण घरी आपल्या माणसांसमोर दोन शब्द बोलायलाही संकोचतात किंवा त्यांना वेळ नसल्यासारखे दाखवतात. लग्नसमारंभ, वाढदिवस, यात्रा हे सारे आता कंटेंट झाले आहेत. लोकांना स्वादिष्ट–रुचकर पदार्थ पाहून तोंडाला पाणी सुटण्याऐवजी किंवा त्यांचा आस्वाद घेण्यासाठी आगतिक होण्यापेक्षाही या पदार्थांचे फोटो आणि व्हिडिओ कधी काढेन आणि सोशल मीडियावर कधी टाकेन यासाठीची घाई झालेली असते.

याचे कारणही स्पष्ट आहे. लाईक्स वाढताना पाहणे हीदेखील एक ‘किक’ आहे. त्यातही यामधून पैसे मिळू लागले तर मग सोन्याहून पिवळे. या स्क्रीनवरील लोकप्रियतेने लाजह्नसंकोच सारे काही धुवून काढले आहे. शिकण्याची–ह्नसमजून घेण्याची आवडच संपवली आहे. सोशल मीडियाने लोकांना प्रसिद्ध कमी केले आहे, ‘फेम–हंग्री’ जास्त बनवले आहे. प्रत्येकाला एका व्हायरल आयटमची आस लागून राहिली आहे. किंबहुना, आजच्या जगात तीच प्रतिष्ठा आणि ओळख बनली आहे. डिग्री वगैरे असणे आता सामान्य झाले आहे. (अर्थात तिचे महत्त्व काय आहे हेही साऱ्यांना माहीत आहे.)

सोशल मीडियाने सगळेच अ–सोशल केले आहे. इतके की उद्या जर सोशल मीडियावर बंदी घातली तर अनेकांचा श्वासोच्छ्वासच अडेल. ईएमआयवर घेतलेले ५०–६० हजारांच्या स्मार्टफोनचे काय करायचे? ओळखीचे संकट? कमाई थांबेल? अख्खी पिढी डिप्रेशनमध्ये जाईल. नेपाळमध्ये हेच घडले. सोशल मीडियावरील दोन दिवसांच्या बंदीने देशभर हलकल्लोळ उडाला.

भारतामध्ये ७० कोटींपेक्षा जास्त लोक इंटरनेट वापरतात आणि त्यातील बहुतांश लोक काय करतात हे सर्वांना माहीतच आहे. आकडे सांगतात की, भारतातील सर्वात जास्त वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअॅपच्या प्लॅटफॉर्मवर आजघडीला ह्न५३ कोटी १४ लाख सक्रिय वापरकर्ते आहेत. त्यानंतर इंस्टाग्रामह्न५१ कोटी ६९ लाख, फेसबुकह्न४९ कोटी २७ लाख, टेलिग्रामह्न३८ कोटी ४० लाख, फेसबुक मेसेंजरह्न३४ कोटी ३९ लाख; आणि ट्विटर म्हणजे एक्सह्न२९ कोटींहून अधिक वापरकर्ते अशी डोळे दीपवणारी यादी आहे.

सोशल मीडियाच्या विश्वात बुडून गेलेल्यांना यामागच्या अर्थकारणाची जराही कल्पना नसते. किंबहुना, त्याविषयी जाणून घेण्याचीही इच्छा नसते. पण वाचकहो, आज कोट्यवधी लोक दिवसरात्र स्क्रोल करत बसतात, लाईक्स मोजतात; पण याचा लाभ घेत कमाई करणारे खेळाडू वेगळेच आहेत. भारतातील सोशल मीडिया बाजार आता ३०–३५ हजार कोटींचा झाला आहे. यामध्ये आपल्याला गुंतवून ठेवण्यासाठी फक्त स्क्रीन चमकवत असतात ते प्लॅटफॉर्मह्नसर्वात मोठा हिस्सा मिळवतात. सोशल मीडियाच्या विश्वात अव्वल स्थानी असणारे युट्यूब भारतातून २० हजार कोटी रुपये मिळवते. यातील फक्त चार–पाच हजार कोटी क्रिएटर्सना दिले जातात. म्हणजेच उरलेले १५ हजार कोटी शांतपणे युट्युबकडून आपल्या खात्यात टाकले जातात. इंस्टाग्राम आणि फेसबुक तर ‘ह्नकमाई आमची, नाचा तुम्ही’ असेच म्हणत असतात. एकूण गणित असे की या बाजारातील ८०–८५ टक्के कमाई सोशल मीडिया कंपन्या घेऊन जातात आणि क्रिएटर्सना उरलेले १५–२० टक्के देऊन त्यांच्या माध्यमातून अख्ख्या समाजाला वेडे बनवले जाते.

● **भाष्य**

खरी बोच आणखी खोल आहे. भारतातील ७० कोटी लोक वेळ, मेंदू आणि डेटा खर्च करून सोशल मीडिया चालवत आहेत; पण या महासमुदायाच्या कमाईचा खरा आनंद परदेशस्थांनाच मिळतो. मार्क झुकरबर्गच्या ‘मेटा’चे एकट्याचे भारतातून वार्षिक उत्पन्न १८–२० हजार कोटी रुपये आहे आणि भारतीय क्रिएटर्सना देण्याच्या नावाखाली त्यांच्या खिशातातून जातो मोठ्ठा भोपळा ! म्हणजेच जवळपास शून्य !. ब्रँड डील्स आणि प्रमोशनचा थोडा फार पैसा मिळतोही, पण त्यातील ७० टक्के रक्कम टॉप–१ टक्के क्रिएटर्सकडे जातात. उरलेल्या ९९ टक्क्यांच्या वाट्याला येते लाईक्सची नशा, फॉलोअर्सची भ्रमितावस्था आणि व्हायरल होण्याची अपूर्ण आशा.

जग म्हणते भारत डिजिटल बाजाराचा राजा बनला आहे, पण प्रत्यक्षात हा बाजार भारतीयांपासून कमाई करून अब्जावधी रुपयांचे विदेशी ट्रान्सफर करत आहे. यातील शोकांतिका अशी की, या बाजारात लाखो जण ‘आपण ‘फेमस’ होत आहोत’ या आनंदात मश्गूल आहेत आणि कोट्यवधी जण त्यांना पाहण्यात अमूल्य वेळ वाया घालवत आहेत. आजघडीला भारतीय माणूस दररोज सरासरी तीन तास सोशल मीडियावर आणि सुमारे सात तास इंटरनेटवर घालवतो. अशा आकडेवाऱ्या खूप आहेत, वेगवेगळ्या आहेत. पण निष्कर्ष एकचह्न– जनता, विशेषतः तरुण पिढी, मोबाईल–ह्नइंटरनेट–ह्नसोशल मीडियात पूर्ण बुडालेली आहे.

मोफत धान्य, स्वस्त डेटा आणि एक स्मार्टफोन हेच सध्या जीवन झाले आहे. एआय आधारित अल्गोरिदम आता हे व्यसन आणखी तीव्र करत आहेत. ह्नतुम्ही जितके स्क्रोल कराल, तितका पुढचा डोपामिन डोस तुमच्या मेंदूला दिला जात आहे. माणसाला स्क्रीनला चिकटवून ठेवणे हा सर्वात मोठा व्यवसाय आहे. हे बनवणारे त्यात अजून मसाला घालण्याच्या शोधात आहेत. अशा वेळी हा प्रवाह आपणच थांबवू शकतो. बंदी हा फक्त तात्पुरता उपाय झाला. त्यातून पळवाटा काढण्यास वेळ लागत नाही. म्हणून बदल आपणच करावा लागेल.आपल्या मनात कोरून ठेवायला हवे की हातात मोबाइल धरून सतत स्क्रोल करत बसण्याने ना आपले भले होणार आहे, ना आपल्या आप्तेष्टांचे, ना राष्ट्राचे ! पण त्यातून विदेशी कंपन्यांची चांदी होणार आहे !

(लेखक पत्रकार आहेत.) ■

---

## ‘लान्सेट’चे अंजन

**गेल्या काही दशकांत जगभरात झपाट्याने वाढलेल्या अल्ट्रा–प्रोसेस्ड किंवा अतिप्रक्रियायुक्त अन्नपदार्थांच्या अतिसेवनाचा नागरिकांच्या आरोग्यावर कसा प्रतिकूल परिणाम झाला आहे, याचे बहुआयामी विश्लेषण ‘द लॅन्सेट’ या जगप्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिकाच्या तीन भागांच्या मालिकेतील पहिल्या संशोधनपत्रात करण्यात आले आहे. यामध्ये तीन मुख्य गृहितकांची तपासणी केली गेली असून त्यातील प्रत्येक गृहितकाला उपलब्ध पुरावे ठोसपणे आधार देणारे आहेत. जंक फूड मानल्या जाणाऱ्या या पदार्थांमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येत आहे, दीर्घकालीन आजार वाढत आहेत आणि समाजात आरोग्याशी संबंधित असमानता अधिक गडद होत आहे. असे असूनही सरकारे आणि धोरणकर्ते या उद्योगावर कठोर नियमन लागू करण्यास कचरतात. कारण जंक फूड उद्योग इतका ताकदवर झाला आहे की तो सतत लॉबिंग, मार्केटिंग आणि जनसंपर्क मोहिमांद्वारे धोरणनिर्मितीवर जबरदस्त प्रभाव टाकतो.**

जगप्रसिद्ध वैद्यकीय पत्रिका ‘द लॅन्सेट’ने अलीकडेच मानवी आहारात वाढत चाललेल्या अल्ट्रा–प्रोसेस्ड फूड अर्थात अत्यधिक प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांवर आधारित सखोल संशोधन–शृंखला प्रकाशित केली आहे. या शृंखलेचे सार असे की, जंक फूड मानल्या जाणाऱ्या या पदार्थांमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येत आहे, दीर्घकालीन आजार वाढत आहेत आणि समाजात आरोग्याशी संबंधित असमानता अधिक गडद होत आहे. बहुतेक खाद्यपदार्थ काही प्रमाणात प्रक्रियेतून जात असतात; गहू दळून पीठ करणे किंवा तांदूळ–दाळ मिलिंग करून टिकाऊ बनवणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण जेव्हा शेतीमालावर कारखान्यांमध्ये अतिरेकी प्रक्रिया केली जाते, रासायनिक बदल घडवले जातात, अॅडिटिव्हज मिसळून ते पदार्थ कृत्रिमरीत्या आरोग्यदायी असल्याचा भ्रम निर्माण करत बाजारात मोठ्या ब्रँडिंगसह विकले जातात तेव्हा समस्या निर्माण होते. पारंपरिक प्रक्रियांनुसार वाळवणे, थंड करणे, गोठवणे, पाश्चराइज करणे, बेक करणे, आंबवणे किंवा बाटलीबंद करणे या पद्धतींनी अन्नपदार्थांचा नैसर्गिकपणा टिकून राहतो, त्याचे आयुष्य वाढते आणि चवही सुधारते. पण अल्ट्रा–प्रोसेसिंगमुळे अन्नपदार्थांमध्ये खोल रासायनिक बदल होतात. त्यांना दीर्घकाळ टिकणाऱ्या, रेडी–टू–ईट उत्पादनांमध्ये रूपांतरित केले जाते आणि त्यांना दीर्घकाळ टिकणाऱ्या, रेडी–टू–ईट उत्पादनांमध्ये रूपांतरित केले जाते. अशा उत्पादनांमध्ये साखर मिसळलेले पेय, पॅकेज्ड स्नॅक्स, चिप्स, इन्स्टंट नूडल्स, तयार मांस, काही नाश्त्याचे सीरियल्स आणि फ्लेवर्ड योगर्ट यांचा समावेश आहे.

या प्रकारच्या अतिप्रक्रिया केलेल्या अन्नाचे सेवन वाढल्याने ताजे, कमी प्रक्रिया केलेले अन्न आपोआपच दैनंदिन आहारातून कमी होत जाते आणि त्याऐवजी शरीरासाठी हानिकारक कॅलरी, चरबी, साखर व मीठ वाढत जाते. यातून स्थूलता, हृदयविकार, मधुमेह आणि अनेक दीर्घकालीन आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो.

अल्ट्रा प्रोसेसड् फूड हे केवळ मानवी शरीरासाठीच नव्हे तर पृथ्वीच्या आरोग्यासाठीही घातक आहे. कारण अशा उत्पादनांच्या निर्मिती आणि वाहतुकीसाठी प्रचंड जैविक इंधनाचे ज्वलन होते. तसेच त्यांचे पॅकेजिंग बहुतेकदा प्लास्टिकचे असल्याने पर्यावरणात मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. ‘द लॅन्सेट’च्या या शृंखलेत जगभरातून गोळा केलेल्या पुराव्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्या पुराव्यांनुसार पारंपरिक, पोषणप्रधान खाद्यसंस्कृती वेगाने नष्ट होत चालली असून तिची जागा अल्ट्रा–प्रोसेस्ड खाद्यपदार्थ घेत आहेत. आतापर्यंत जंक फूडचे प्रमाण तुलनेने कमी होते अशा प्रदेशांमध्येही ही सवय पसरण्यास सुरुवात झाली आहे. अल्ट्रा–प्रोसेस्ड पदार्थांची सवय लागल्याने आहाराची गुणवत्ता लक्षणीयरीत्या घसरते, हेही या अभ्यासातून समोर आले आहे.

जागतिक अभ्यासानुसार, आधुनिक खाद्यसंस्कृतीत अल्ट्रा–प्रोसेस्ड पदार्थांनी व्यापलेली जागा ही दीर्घकालीन आजारांच्या वाढत्या ओझ्याचे एक प्रमुख कारण ठरली आहे. इतक्या स्पष्ट पुराव्यानंतरही सरकारे आणि धोरणकर्ते या उद्योगावर कठोर नियमन लागू करण्यास कचरतात, ही खरी शोकांतिका आहे. यामागचे कारण जंक फूड उद्योग इतका ताकदवर झाला आहे की तो सतत लॉबिंग, मार्केटिंग आणि जनसंपर्क मोहिमांद्वारे धोरणनिर्मितीवर जबरदस्त प्रभाव टाकतो.

द लॅन्सेट शृंखलेत दाखवलेल्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये कोका–कोला, पेप्सिको आणि मोंडेलेझ या तीन मोठ्या कंपन्यांनी मिळून एकूण १३.२ अब्ज डॉलर केवळ जाहिरातींवर खर्च केले. ही रक्कम जागतिक आरोग्य संघटनेच्या वार्षिक बजेटपेक्षा जवळजवळ चारपट अधिक आहे. जंक फूड मार्केटिंगचा उद्देश लोकांच्या सांस्कृतिक आवडीनिवडी बदलणे, मागणी निर्माण करणे आणि आरोग्यास हानिकारक पदार्थांना सामान्य व स्वीकारार्ह बनवणे हा आहे. कोका–कोला दररोज २०० देशांमध्ये २.२ अब्ज बाटल्या किंवा कॅन विकते, ज्यांची निर्मिती ९५० बॉटलिंग प्लांटद्वारे केली जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणातील उत्पादन व वितरणक्षमता त्यांना प्रचंड राजकीय प्रभाव देते. त्या पुरवठा, रोजगार आणि गुंतवणूक थांबवण्याची धमकी देऊन सरकारांवर दबाव आणतात. सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञांनी या कॉर्पोरेट राजकीय हस्तक्षेपाला अल्ट्रा–प्रोसेस्ड फूडमुळे होणारे नुकसान नियंत्रित करण्याच्या मार्गातील सर्वात मोठे अडथळा म्हटले आहे. या मोठ्या कंपन्या तंबाखू आणि मद्य उद्योगाच्या धर्तीवरच आपली रणनीती आखतात. त्यांचा मुख्य हेतू विरोध दडपणे आणि नियामक अडथळे रोखणे हा असतो. त्यासाठी त्या आपले हितसंबंधी गट, प्रायोजित संशोधन संस्था आणि जागतिक नेटवर्कचा वापर करतात. लॉबिंगव्यतिरिक्त त्या सरकारी यंत्रणांमध्ये आपले लोक बसवतात, कॉर्पोरेट अनुकूल नियमन मॉडेल पुढे करतात आणि ‘वैज्ञानिक गोंधळ’ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जंक फूड उद्योगातील मोठे गट खाद्य नियामक संस्थांसोबत विविध ‘आरोग्य–जागृती’ कार्यक्रम चालवतात. प्रत्यक्षात ही सार्वजनिक आरोग्याची चेष्टा आहे. पण दुर्दैवाची बाब म्हणजे सरकार अद्याप स्पष्टपणे अतिरिक्त चरबी, साखर आणि मीठ असलेल्या अल्ट्रा–प्रोसेस्ड पदार्थांची व्याख्या करू शकलेले नाही. २०१७ मध्ये या पदार्थांच्या जाहिरातींवर निर्बंध आणण्याची सूचना देण्यात आली होती, परंतु ती अद्याप लागू झालेली नाही. अन्नधान्य प्रक्रिया मंत्रालयाची स्थापना शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी झाली होती, परंतु प्रत्यक्षात ते जंक फूड उद्योगाला प्रोत्साहन देणारे आणि त्यांना सबसिडी देणारे मंत्रालय बनले आहे. आता तरी प्रक्रियायुक्त अन्नपदार्थ आणि अतिप्रक्रियायुक्त अन्नपदार्थ यात स्पष्ट फरक करण्याची वेळ आली आहे.

‘द लॅन्सेट’ शृंखलेचा स्पष्ट निष्कर्ष असा आहे की, पाकिटबंद उत्पादनांच्या पुढच्या बाजूस ठळक इशारा छापला गेला पाहिजे. एका बाजूला आरोग्य मंत्रालय असंसर्गजन्य रोगांच्या वाढीचा इशारा देत असताना दुसऱ्या बाजूला अन्नप्रक्रिया मंत्रालय जंक फूड उद्योगाला सबसिडी देते, ही परिस्थिती अत्यंत विसंगत आहे. योग्य आहार घेणे आणि तंदुरुस्त राहणे ही प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी असते, परंतु सरकारने नागरिकांना योग्य निवड करता येईल असे वातावरण तयार करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**– डॉ. संजय गायकवाड** ■

स्वप्नासारखं सजवा घर!
सुंदर व दर्जेदार फर्निशिंगची भव्य रेंज!
सोफासेट • वॉलपेपर्स • कर्टन्स • कार्पेट • गालिचा • बेडशीट • ब्लँकेट • मॅट्रेस • अन्य अनेक व्हरायटीज.
राजेंद्र खरेदीसोबत होम डेकोर
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 8453484950

संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..
बांधिलकी जनहिताची
# नायक
सायं.दैनिक
संपादक : गोरक्षनाथ मदने
कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

वीज बिलात बचत म्हणजे विवान एनर्जीचा रूफटॉप सोलर..!
उपलब्ध शासकीय सबसिडी ₹ 78,000/-*
सर्व प्रकारचे फायनान्स उपलब्ध
VIVAN ENERGY
• मंगल कार्यालये • निवासी इमारत
• हॉटेल / रेस्टॉरंट • बँक / हॉस्पिटल
• कोल्ड स्टोरेज • शाळा / महाविद्यालये
• एसी पोल्ट्री फार्म • औद्योगिक वसाहत
अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.
vivanenergy.com
Sangamner • Chh.Sambhaji Nagar • Sinnar • Nashik • Ahilyanagar 77 1100 2100

Sangamner ▪ MAHMAR/2018/75654 ▪ वर्ष ८ ▪ अंक १९५ ▪ १४/१२/२०२५ (दैनिक) ▪ किंमत रु.२/- ▪ पाने ८

होलसेल बस्ता खरेदीसोबत तुम्ही पण जिंका ! FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090
DESIGN 8275522373

चवीला खरे कोथमिरे!
कोथमिरे मसाले SINCE 1992
www.kothmiremasale.com
CALL +91 93705 84332

# एक कोटीचा गांजा तस्कर अखेर गजाआड!

**विधानसभेत गाजला होता मुद्दा**

## प्रकटीकरण शाखेची पहाटे कारवाई



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

वरीष्ठ पातळीवरुन मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर सुकेवाडी शिवारात झालेल्या कारवाईत तब्बल एक कोटी १४ हजार रुपयांचे बाजारमूल्य असलेला ४५६ किलो गांजा हस्तगत होवूनही गांजा तस्कर मात्र पसार होता. संगमनेर शहरातील या कारवाईने गल्लीपासून थेट विधानसभेपर्यंत चर्चा झाल्याने पोलिसांवरील दबावही वाढला होता. त्यातून सलग दुसऱ्या दिवशी पोलिसांनी गोल्डनसिटीत छापा घालीत गांजाचे आणखी एक गोदाम उघड करुन ३३ किलो गांजासह चौघांना अटक केली. आता सुकेवाडी प्रकरणात पसार असलेल्या तुषार उर्फ दमल्या उत्तम पडवळ हा घुलेवाडी परिसरात असल्याचा सुगावा लागताच पोलिसांच्या प्रकटीकरण शाखेने पहाटे छापा घालीत त्याच्याही मुसक्या आवळल्या आहेत. गेल्या दोन दिवसांतील कारवाईत पोलिसांनी एक कोटी २२ लाख रुपये किंमतीचा ४८९ किलो गांजा (पान ७ वर)

### शहर पोलीस अनभिज्ञ कसे?

■ संगमनेर शहरापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावरील इतक्या मोठ्या गांजा गोदामाबाबत थेट राज्याच्या वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना इत्यंभूत माहिती मिळते मात्र जिल्ह्याच्या स्थानिक गुन्हे शाखेसह स्थानिक पोलिसांना त्यांचा थांगपत्ता नसतो हा विचारच मुळात आता हास्यास्पद वाटत आहे. इतक्या राजरोसपणे मोक्याची जागा हेरुन उभारलेल्या या नेटवर्कची व्याप्तीही खूप मोठी असण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे गेल्या महिन्यात स्थानिक पोलिसांनी 'एमडी' या घातक अमलीपदार्थाचा तस्करही जेरबंद केला होता. मात्र त्याच्या तपासाबाबत फारकाही दिलासादायक समोर आलेले नाही. त्यावरुन शहरात सहज उपलब्ध असलेल्या अमलीपदार्थांमागे स्थानिक पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचा आशीर्वाद नाकारता येणार नाही. अन्यथा वरील दोन्ही प्रकरणाच्या तपासाला एव्हाना वेगही आला असता आणि त्यात अडकलेली संपूर्ण पुरवठा साखळीही उघड झाली असती.

# रेल्वेमार्गावरुन 'संभ्रम' निर्माण झाल्याचे नामदार विखेंचे पत्र!

## लोकप्रतिनिधींच्या संयुक्त बैठकीची मागणी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

**विश्वासात घेवूनच निर्णयाचे आवाहन**

पुणे-नाशिक व्हाया संगमनेर सेमी हायस्पीड रेल्वेमार्गावरुन उत्तरेतील राजकारण चांगलेच तापले असून माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह आमदार सत्यजीत तांबे यांनी नाव न घेता जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीच रेल्वेमार्ग पळवल्याचा रोख कायम ठेवल्याने जिल्ह्यातील राजकारणात संभ्रम निर्माण झाला आहे. तो दूर करण्यासाठी नामदार विखे-पाटील यांनीच पुढाकार घेतला असून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी पत्रव्यवहार करताना त्यांनी प्रस्तावित रेल्वेमार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींची संयुक्त बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. (पान ७ वर)



### रेल्वे असतानाही पळवापळवी कशाला? : माजीमंत्री थोरात

■ पुण्याहून नाशिकला जाण्याचा नैसर्गिक मार्ग कोणता असा प्रश्न एखाद्या लहान मुलालाही विचारला तरीही तो व्हाया संगमनेर असाच नकाशा काढून दाखवेल. खऱ्या अर्थाने पुणे-मुंबई आणि नाशिक असा सुवर्ण त्रिकोण साधणाऱ्या या रेल्वेमार्गामुळे केवळ संगमनेरच नाहीतर लोणीचाही विकास होणार होता असा चिमटा घेत माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी रेल्वेप्रकल्पावरुन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर आज पुन्हा निशाणा साधला.

आज ज्या प्रमाणे विमानतळ महत्वाचे आहे, तसे निळवंडे धरणही महत्वाचे असल्याचा टोला लगावताना त्यांनी पुढील (पान ७ वर)



त्वरीत पाहिजेत

| अ.क्र. | पद | एकूण |
|---|---|---|
| १) | सेल्सपर्सन | ०४ |
| २) | कॅशियर | ०१ |

(महिला / पुरुष) अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार व सवलती
संपर्क : 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर. ०२४२५-२२३८६२ ७५८८२ ४९८४९

छोट्यांसाठी सर्वकाही एकाच दालनात, थाटामाटात दिसतील लग्नसोहळ्यात!
स्पेशालिस्ट बॉर्न बेबी आयटम्स्
सारीका चिल्ड्रन ॲण्ड लेडीज वेअर
बाजारपेठ, प्रतिभा फोटो शेजारी, संगमनेर 98223 58335

VACANT
पाहिजेत
हेल्पर - १ पुरुष / १ महिला
कॅशिअर - २ जागा पुरुष
टेलिकॉलिंग- १ जागा महिला
अनुभव असल्यास प्राधान्य
9372012044
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 937201 2044
ओम मयूर ज्वेलर्स

काजळे ज्वेलर्स
विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
मार्केट मधील सर्वात कमी सोने भाव
मजुरीवर मिळवा 21% सूट
ऑफर कालावधी २७ ऑक्टोबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५
9601222777, 9615222777 बस स्टँड कॉम्प्लेक्स, पुणे-नाशिक हायवे, संगमनेर

चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)
डॉ.सौ. उज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच., कन्सल्टंट पेडिॲट्रिशियन
तज्ञ - बालरोग, नवजात अर्भक, प्रिमॅच्युअर बेबी केअर
डॉ.नितीन जठार
एम.बी.बी.एस. डी.टी.सी.डी., कन्सल्टंट फिजिशियन
तज्ञ - छातीचे, हृदयरोग, टी.बी. व दम्याचे विकार
उपलब्ध निदान सुविधा
अत्याधुनिक अतिदक्षता विभाग ▪ जनरल सर्जरी
आपत्कालिन औषधे व उपचार ▪ मधुमेह व हृदयरोग
दमा व श्वसनाचे ▪ फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
बालरोग चिकित्सा विभाग ▪ सर्पदंश व विषबाधा
पोटाचे विकार औषधे व शस्त्रक्रिया ▪ किडनी विकार
संधीवात व मनके विकार ▪ मेंदू विकार व शस्त्रक्रिया
सी.टी. स्कॅन
डायलिसीस
डिजीटल एक्स-रे
सोनोग्राफी
2-डि इको
स्पायरोमेट्री
पॅथोलॉजी (लॅब)

भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# सिनेमॅटिक




## ‘फौजी’ दोन भागात येणार

सुपरस्टार प्रभासचा बहुप्रतिक्षित चित्रपट ‘फौजी’ आता एक नाही तर दोन भागात प्रदर्शित होणार आहे. ‘सीता रामम’चे दिग्दर्शक हनु राघवपुडी यांच्या दिग्दर्शनात तयार होणाऱ्या या चित्रपटात प्रभास आझाद हिंद फौजेतील एका सैनिकाच्या भूमिकेत दिसणार आहे. मैत्री मूव्ही मेकर्सने अलीकडेच शक्तिशाली शीर्षक पोस्टर प्रदर्शित केले असून प्रभासचा दमदार लूक सोशल मीडियावर जोरदार चर्चेत आहे.

दिग्दर्शक राघवपुडी यांच्या मते, पहिल्या भागात प्रभासचे एक जग उलगडले जाईल, तर दुसऱ्या भागात पूर्णपणे वेगळा आयाम प्रेक्षकांसमोर येणार आहे. ‘आपल्या इतिहासात अनेक अशा कथा आहेत ज्या दुर्दैवीरीत्या संपल्या, परंतु दुसऱ्या वास्तवात त्या परीकथेप्रमाणे भासू शकतात,’ असे ते सांगतात. काही वास्तविक अनुभवही कथानकात गुंफले आहेत. ‘बाहुबली’नंतर प्रभास पुन्हा एकदा पीरियड ड्रामा घेऊन येत असून ‘फौजी’ हा मैत्री मूव्ही मेकर्सचा सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे.



## लग्नाला एक्सपायरी डेट हवी

अभिनेत्री काजोल आणि ट्विंकल यांचा ‘टू मच विथ काजोल अँड ट्विंकल’ हा शो सध्या चर्चेत आहे. या शोमध्ये अनेक बॉलिवूड सेलिब्रेटी हजेरी लावतात. अलीकडेच विकी कौशल आणि क्रिती सेनन यांनी या शोमध्ये नुकतीच हजेरी लावली. यादरम्यान, काजोलने लग्नाबद्दल केलेलं वक्तव्य चर्चेत आले आहे. या शोमध्ये ‘लग्नाला एसपायरी डेट असावी का?’ असा प्रश्न विचारण्यात आला. यावर काजोलने सहमती दर्शवली आणि हिरव्या बॉसमध्ये उभी राहिली.

यावर काजोल म्हणाली, ‘मला असं वाटतं कारण कोणी असं सांगून थोडेच ठेवलंय की, योग्य वेळी योग्य मुलाशी लग्न होईल? त्यामुळे दुसऱ्या लग्नाचा पर्याय असावा आणि जर एक्सपायरी डेट असेल तर जास्त काळ त्रास सहन करावा लागणार नाही’ तर ट्विंकल म्हणाली की, ‘मला वाटत नाही असं असायला हवं, कारण हे लग्न आहे, वॉशिंग मशीन नाही.’

यावेळी काजोलने आपल्या मताशी सहमत होण्यासाठी ट्विंकलचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्नही केला, परंतु क्रिती आणि विकी यांनी ट्विंकलच्या बाजूने सहमती दर्शवून काजोलला विरोध केला. याचदरम्यान, पैशांनी आनंद विकत घेता येतो की नाही असं विचारलं असता यावर ट्विंकल आणि विकी कौशलने सहमती दर्शवली तर काजोल आणि क्रितीने असहमती दर्शवली. काजोल म्हणाली की, ‘मला असं वाटत नाही.

कितीही पैसे असले तरी त्याने आनंद विकत घेता येत नाही.’ काजोल आणि ट्विंकल खन्नाची ही बोल्ड आणि बिनधास्त विधानं सध्या चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी ट्विंकल खन्नाने आजकालची पिढी कपडे बदलतात तसे पार्टनर बदलते, हे चांगलं असल्याचं म्हटलं होतं. त्यामुळे ट्विंकलला सोशल मीडियावर ट्रोलही करण्यात आले होते.

## ‘रेड’चे तिसरे पुष्प पुढील वर्षी

अभिनेता अजय देवगणची मुख्य भूमिका असलेला ‘रेड’ चित्रपट २०१८ मध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर २०२५ मध्ये ‘रेड २‘ आला. या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. आता रेडच्या तिसऱ्या भागाची चर्चा रंगली असून, याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. निर्माते रेड फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागावर काम करत असून अजय देवगणचा ‘रेड ३‘ लवकरच प्रदर्शित होणार आहे. यानिमित्ताने अजय पुन्हा एकदा दिग्दर्शक राजकुमार गुप्ता यांच्यासोबत काम करताना दिसणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून निर्माते या चित्रपटाच्या स्क्रिप्टवर काम करत आहेत. चित्रपटाची पटकथा अंतिम टप्प्यात आली आहे. पुढच्या वर्षी रेड ३ च्या चित्रीकरणाला सुरूवात केली जाणार आहे. रेडचा तिसरा भाग पहिल्या दोन भागंपेक्षा अधिक प्रभावी असणार आहे. या चित्रपटाची कथा पहिल्या दोन भागांपेक्षा वेगळी असणार आहे. अजय देवगण अनेक चित्रपटांमध्ये व्यस्त आहे. त्याचे सध्याचे प्रकल्प पूर्ण होताच निर्माते या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करतील, अशी माहिती आहे. जून २०२६ च्या आसपासची तारीख निश्चित केली आहे. अजय देवगणने ‘रेड’मध्ये एका आयकर अधिकाऱ्याची भूमिका केली होती. या चित्रपटाने जगभरात १५० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. तर २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘रेड २’ लाही चांगला प्रतिसाद मिळाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २०० कोटींचा टप्पा ओलांडला. जगभरात या चित्रपटाने २३५ कोटींपेक्षा जास्त कमाई केली. त्यामुळे अजयच्या चाहत्यांना रेड ३ ची उत्सुकता लागलेली आहे.






## अक्षयची सेटवर मस्ती

बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमार जेव्हा सेटवर असतो तेव्हा तो अभिनयासोबतच खूप मजा-मस्ती आणि धमाल करतो. अलीकडेच सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्यामध्ये तो सुनिल शेट्टी, परेश रावल, अर्शद वारसी, जॉनी लिवर आणि दिशा पटानी या कलाकारांसोबत दिसतो आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये दिग्दर्शक अहमद खान अक्षय कुमारला एक डान्स सीक्वेन्स समजावून सांगत असून, अक्षय मजेने बासरी वाजवताना दिसतो. त्याच्यासोबत सर्व कलाकार मजेदार पद्धतीने त्यांच्या डान्स मूव्हचा सराव करत आहेत.



## ‘सिलिकॉन-मुक्त’ जीवन

*सध्या बॉलिवूडमध्ये एका अभिनेत्रीच्या निर्णयाची जोरदार चर्चा आहे. अभिनेत्री शर्लिन चोप्राने तिच्या शरीरातील ब्रेस्ट इम्प्लांट्स काढून टाकण्यासाठी यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. सिलिकॉनमुळे होणाऱ्या असह्य वेदना आणि जडपणामुळे तिने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. तिच्या या ‘सिलिकॉन-मुक्त’ प्रवासाबद्दल आणि शस्त्रक्रियेनंतरच्या अनुभवाबद्दल सविस्तर माहिती...*

सौंदर्य वाढवण्यासाठी केलेल्या सर्जरी कधी कधी वेदनादायी ठरू शकतात. ही गोष्ट सिद्ध केली आहे अभिनेत्री शर्लिन चोप्राने. ज्या अभिनेत्री मोठ्या उत्साहाने ब्रेस्ट इम्प्लांट्स करतात, त्यापैकीच एका अभिनेत्रीने आता हे इम्प्लांट्स काढून टाकण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. असह्य पाठदुखी आणि छातीतील जडपणामुळे शर्लिन चोप्राने नुकतीच एक मोठी शस्त्रक्रिया केली आहे... या निर्णयाबद्दल बोलताना शर्लिन म्हणाली, ‘माझ्या मते, आयुष्यात कोणत्याही प्रकारचा भार घेऊन चालणे आवश्यक नाही.' तिच्या या निर्णयाने तिचे नैसर्गिक रूप परत आणले असून, ‘सिलिकॉन-मुक्त’ जीवनाचा हा प्रवास इतर महिलांनाही एक महत्त्वाचा संदेश देणारा आहे.’ तिने केवळ इम्प्लांट्सच नव्हे, तर पूर्वी केलेले चेहऱ्यावरील फिलर्स देखील काढून टाकले आहेत. नैसर्गिक लूककडे वाटचाल करण्याचा शर्लिन चोप्राचा हा धाडसी प्रवास आता पूर्ण झाला असून, चाहते तिच्या नव्या आणि वेदनामुक्त जीवनासाठी शुभेच्छा देत आहेत. शर्लिन चोप्राने या पोस्टशिवाय एक व्हिडीओही शेअर केला. या व्हिडीओत ती सांगताना दिसत आहे की, एका स्तनात ८२५ ग्रॅम सिलिकॉन होते. आपल्या शरीराशी खेळू नका. माझ्या मते, आयुष्यात कोणत्याही प्रकारचा भार घेऊन चालणे आवश्यक नाही. हे पूर्णपणे माझे स्वतःचे मत आहे. प्रत्येकाचे स्वतःचे मत असू शकते. त्या सर्व डॉक्टरांचे आभार ज्यांनी माझ्या या प्रवासात मदत केली.



## पन्नाशी जवळ असूनही इमरान हाश्मी इतका फिट कसा?

बॉलिवूड अभिनेता इमरान हाश्मी आता पन्नाशीच्या जवळ पोहोचला आहे, पण त्याचा फिटनेस आणि उत्साह पाहून त्याच्या वयाचा अजिबात अंदाज येत नाही. तो आजही तेवढाच फिट आणि तरुण दिसतो. त्याच्या या कमालीच्या फिटनेसचे आणि तरुणपणाचे गुपित काय आहे, हे त्यानेच एका मुलाखतीत सांगितले आहे.

इमरान हाश्मी सध्या एक अत्यंत विचित्र आणि शिस्तबद्ध डाएट फॉलो करत आहे. त्याने सांगितले की, तो गेल्या दोन वर्षांपासून दररोज जवळजवळ एकच प्रकारचा आहार घेत आहे, ज्यामुळे त्याच्या आयुष्यात मोठा फरक पडला आहे. ‘अख्खा बॉलिवूड एक तरफ और इमरान हाश्मी एक तरफ’ हा डायलॉग त्याच्या चाहत्यांमध्ये सध्या खूप लोकप्रिय झाला आहे. त्याचे चित्रपट आणि गाणी प्रेक्षकांच्या मनात अजूनही क्रेझ टिकवून आहेत.

इमरान हाश्मीने चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान दिलेल्या मुलाखतीत त्याच्या फिटनेसचे रहस्य उघड केले. हा डाएट प्लॅन त्याने फिटनेस व्यावसायिक आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केला होता, जो तो गेली दोन वर्षे न चुकता पाळत आहे. इमरान हाश्मी दिवसातून फक्त दोन वेळा जेवतो. याबद्दल सांगताना इमरान म्हणाला, ‘मी दिवसातून फक्त दोन वेळाच खातो आणि वर्षभर मी तेच खात आहे. हो, ते कंटाळवाणे आहे, पण माझ्यासाठी ते सर्वात सोपे आहे.’ तो केवळ चिकन मिन्स, सॅलड आणि गोड बटाटे (रताळे) खातो.

आहार निवडण्याचे कारण त्याने सांगितले, ‘मी चिकन मिन्स खातो कारण ते पचायला सोपे आहे. मी संपूर्ण चिकन खाऊ शकत नाही, म्हणून मी फक्त मिन्स खातो. माझी बायको म्हणते की मी रोज तेच अन्न कसे खाऊ शकतो. तिला त्याचा कंटाळा येतो. पण मला माहिती आहे की प्रत्येकासाठी अन्नाचा अर्थ वेगवेगळा असतो. माझ्यासाठी तो महत्त्वाचा आहे.’ आपल्या आहारात तो नेमके काय घेतो, याचे तपशील देताना त्याने सांगितले, ‘सॅलड : यामध्ये ॲव्होकॅडो, ब्रुसेल्स स्प्राउट्स, लेट्यूस, रॉकेट लीफस, रताळे आणि थोडेसे बाल्सॅमिक व्हिनेगर असते. आहारासोबतच व्यायामाची जोड असल्यामुळेच इमरानचा हा लूक टिकून आहे. तो त्याच्या इंस्टाग्रामवर जिममध्ये व्यायाम करतानाचे अनेक फोटो आणि व्हिडिओ नेहमीच पोस्ट करत असतो.



## नृत्यातून कामाचे समाधान

अभिनेत्री मलायका अरोरा अनेकदा तिच्या खासगी आयुष्यामुळे सोशल मीडियावर चर्चेत असते. अफेअर्सवरून तिला नेटकरी ट्रोलसुद्धा करतात. याच ट्रोलिंगवर आता मलायकाने रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे. ट्रोलर्सची पर्वा करत नसल्याचे तिने म्हटले. अभिनेत्री मलायका अरोराने नुकतीच पन्नाशी ओलांडली. मलायका तिच्या फिटनेसमुळे आणि ग्लॅमरस अंदाजामुळे सतत चर्चेत राहते. पण त्याचसोबत ती तिच्या खासगी आयुष्यामुळेही अनेकांचे लक्ष वेधून घेते. अर्जुन कपूरसोबत ब्रेकअप झाल्यानंतर मलायकाचे नाव सतत कोणा ना कोणाशी जोडले जाते. यादरम्यान तिच्या एका डान्स व्हिडीओवरही नेटकऱ्यांनी प्रचंड ट्रोल केले. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत मलायकाने या ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. अरबाज खानसोबतचा घटस्फोट, मुलगा अरहानचं संगोपन, अर्जुनसोबतचं अफेअर-ब्रेकअप अशा विविध कारणांमुळे मलायकाला अनेकदा ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे. मलायका म्हणाली, ‘मी माझ्या सत्यावर लक्ष केंद्रीत करायला शिकले आहे. त्यामुळे नकारात्मकतेला मी माझ्यावर परिणाम करू देत नाही. ट्रोल्स तर नेहमी ट्रोल्सच राहणार. माझ्यासाठी माझे कुटुंब, मित्रमैत्रिणी आणि शांत मन अधिक महत्त्वाचं आहे.’ यावेळी मलायका तिच्या करिअरबद्दलही मोकळेपणे व्यक्त झाली. अभिनयातून नाही तर नृत्यातून कामाचे अधिक समाधान मिळाल्याचे तिने सांगितले.

# बारा वर्षांच्या संघर्षानंतर वीज कंत्राटी कामगारांना न्याय

## औद्योगिक न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय




**नायक वृत्तसेवा, अकोले**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील २२८५ कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घ्यावे असा ऐतिहासिक निर्णय औद्योगिक न्यायालय, ठाणेचे न्यायाधीश एस. झेड. सोनभद्रे यांनी दिला असून, बारा वर्षांच्या प्रदीर्घ लढ्याला मिळालेले हे यश असल्याची माहिती महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघाचे जिल्हा सचिव सचिन पाटील यांनी दिली.

सन २०१२ पासून कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घ्यावे, यासाठी भारतीय मजदूर संघाशी संलग्न महाराष्ट्र वीज कामगार महासंघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघ सातत्याने प्रयत्नशील होते. त्या काळात महासंघाचे तात्कालीन अध्यक्ष अण्णाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने हे प्रकरण औद्योगिक न्यायालयाकडे वर्ग केले.

या दीर्घकालीन न्याय लढ्यात अनेक अडथळे, सुनावण्या, पुरावे व कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर अखेर कामगारांना न्याय मिळाला. संघटनेतर्फे ज्येष्ठ विधीतज्ज्ञ विजय वैद्य, ॲड. बाळासाहेब देसाई, ॲड. शिरीष राणे यांनी कामगारांची बाजू भक्कमपणे मांडली, तर व्यवस्थापनाच्या वतीने ॲड. एल. आर. मोहिते यांनी काम पाहिले.

■ महावितरणमधील सर्व कंत्राटी कामगारांना कायम कामगार म्हणून मान्यता मिळाली असून २०१२ ते आजपर्यंतचा वेतन फरक, भत्ते आणि सर्व शासकीय लाभ देण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत.हा लाभ सहा महिन्यांत न दिल्यास, प्रलंबित रकमेवर ५ टक्के व्याज देणे बंधनकारक, महावितरणमधील कंत्राटदार व्यवस्था नाममात्र व बनावट असल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.


या ऐतिहासिक निकालाचा फायदा अहिल्यानगर जिल्ह्यातील ५५ कामगारांसह राज्यभरातील सर्व कंत्राटी कामगारांना होणार असून, कंत्राटदारांकडून होणारी पिळवणूक थांबण्यास मोठी मदत मिळणार आहे. निकाल जाहीर होताच जिल्ह्यातील अनेक वीज कार्यालयांसमोर पेढे वाटून, फटाके फोडून कंत्राटी कामगारांनी आनंद व्यक्त केला.

## शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने सतशील आणि प्रामाणिक नेतृत्व हरपले : माजी मंत्री थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री , लोकसभेचे सभापती अशी विविध पदे भूषवताना स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांनी सर्वांना न्याय दिला. लोकशाही आणि काँग्रेस संस्कृतीला ताकद देण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले असून त्यांच्या निधनाने देशाचे सतशील, प्रामाणिक आणि पारदर्शक नेतृत्व हरपले असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने यशोधन कार्यालय येथे प्रतिक्रिया देताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांनी देशाच्या लोकशाहीला ताकद देण्याचे काम आयुष्यभर केले. याचबरोबर काँग्रेस विचारसरणी जपत त्यांनी या विचारांना पाठिंबा दिला. आणि हा विचार पुढे नेण्यासाठी काम केले.



ज्या ज्या पदावर त्यांनी काम केले, त्या सर्व पदांना त्यांनी अत्यंत योग्य न्याय दिला. राज्य पातळीवर विधानसभा अध्यक्ष त्याचप्रमाणे केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे सभापती, राज्यपाल असे विविध पदे भूषवताना त्यांनी सर्वांना सोबत घेऊन समाजाच्या विकासासाठी काम केले. प्रत्येक ठिकाणी प्रामाणिकपणे काम करत सर्वांना न्याय दिला.

त्यांचे व्यक्तिमत्व जवळून पाहण्याची संधी मला मिळाली. लातूरचा पालकमंत्री असताना त्यांचे कामकाज जवळून पाहिले.याचबरोबर ज्या ज्या वेळेस दिल्लीला जायचो त्यावेळेस त्यांची भेट व्हायची. राजकीय, सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनात सुद्धा ते अत्यंत प्रामाणिक आणि शिस्तबद्ध जीवन जगले. त्यांची जीवनशैली ही सर्वांसाठी मार्गदर्शक असल्याची भावना बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे.

माजी आ.डॉ सुधीर तांबे म्हणाले की, अभ्यासू आणि सर्वांना न्याय देणाऱ्या महाराष्ट्राच्या या सुपुत्राने राज्यात आणि देशपातळीवर काम केले. राज्यपाल, केंद्रीय गृहमंत्री, लोकसभा अध्यक्ष असे अनेक पदे भूषवताना त्यांनी समानता आणि लोकशाहीचा विचार जपला. त्यांच्या निधनाने काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ व्यक्तिमत्व हरपले असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे लातूरचे पालकमंत्री होते. त्यावेळेस शिवराज पाटील चाकूरकर यांचा त्यांच्याशी जवळून संबंध आला. राजकारणातील अत्यंत शिस्तबद्ध ,आदर्श आणि पारदर्शक जीवन जगणारे जेष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांचे कार्य तरुण पिढीसाठी सदैव प्रेरणादायी असल्याचे त्या म्हणाल्या.

## मांडवे बुद्रुकच्या प्राथमिक शाळेत विविध गुणदर्शन स्पर्धा उत्साहात

**नायक वृत्तसेवा, साकुर**

संगमनेर तालुक्यातील मांडवे बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विविध गुणदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. अमित धुळगंड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मांडवे बुद्रुक शाळेच्या मुख्याध्यापिका विद्युल्लता भोर, अशोक आहेर, मनीष साळवे, शिंदोडी शाळेचे सुदाम दाते,



तुकाराम गागरे, सुवर्णा खोटरे, योगिता पायमोडे, याचबरोबर सुनील रोकडे, प्रशांत भंडारे, बिंदकुमार नरड, सुदाम साळुंखे, दत्तात्रय ठुबे, सखाराम धिंदळे, वैशाली महांडुळे, बिरेवाडी येथील शिक्षक गंगाराम भांड, सतीश रोकडे, भाऊसाहेब वेडे, शरद पवार, कौठे मलकापूर शाळेचे लक्ष्मण भारती, माया घोरपडे उपस्थित होते. या विविध गुणदर्शन स्पर्धेमध्ये मांडवे बुद्रुक, शिंदोडी,वाडेकर वस्ती,तरंगे वस्ती, शेळकेवाडी, बिरेवाडी, कौठे मलकापूर अंजनी गड, पिंगळे वस्ती, नकटवाडी या शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी हस्ताक्षर, कथाकथन, वेशभूषा, वैयक्तिक गीत गायन, समूहगीत गायन, समूह नृत्य, वकृत्व यांसारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी आपली कला दाखवत सुंदर अक्षर, वेशभूषा, उत्तम भाषणे, गीत गायन आणि नृत्य सादर केले. स्पर्धेत प्रथम, द्वितीय तसेच तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा मांडवे बुद्रुक केंद्र शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तर वेशभूषा सादरीकरण मध्ये प्रथम क्रमांक समृद्धी अमित धुळगंड हिचा आला, तर वकृत्व स्पर्धेमध्ये शिंदोडी येथील शाळेची विद्यार्थिनी अन्वी पंडित पहिली आली, बिरेवाडी येथील गोष्ट कथा सादरीकरण मध्ये प्रज्वल सागर, कौठे मलकापूर येथील गौरी कारंडे यांचा क्रमांक आला. शिक्षकांनी चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांची मेहनत घेऊन ही स्पर्धा पार पडल्याबद्दल शिक्षकांचे आभार शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. अमित धुळगंड यांनी मानले.

## दिव्यांग अधिकारी-कर्मचारी संघटनेची १८ जानेवारीला सर्वसाधारण सभा; नवीन कार्यकारणीची होणार निवड

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग अधिकारी-कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा येत्या १८ जानेवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथे आयोजित केली असून या सभेत जिल्ह्याची नवीन कार्यकारणीची निवड जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष साहेबराव अनाप यांनी दिली.

या सर्वसाधारण सभेला दिव्यांग अधिकारी-कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष साईनाथ पवार, सचिव ललित सोनवणे आदी राज्य कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. या सर्वसाधारण सभेला जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बंधू-भगिनी कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही आवाहन जिल्हाध्यक्ष साहेबराव अनाप यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी-अधिकारी संघटनेच्या घटनेनुसार जिल्ह्यात सर्वसाधारण सभा लावणे व नवीन कार्यकारीची निवड करणे हे अधिकार राज्य कार्यकारिणीकडे असतात. यानुसार जिल्हा शाखेने राज्य कार्यकारिणीकडे सर्वसाधारण सभा लावून नवीन कार्यकारणी गठीत करण्याची विनंती केली होती. त्यानुसार १८ जानेवारीला ही सर्वसाधारण सभा होणार असून यात जिल्ह्याची नवीन कार्यकारणी निवडण्यात येणार आहे. तसेच यावेळी दिव्यांगांचे विविध प्रश्न, संघटनेची भूमिका तसेच जिल्ह्याच्या कार्याचा आढावा घेतला जाईल.

या सर्वसाधारण सभेला जिल्ह्यातील सर्व बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्याध्यक्ष राजू आव्हाड, कोषाध्यक्ष राजेंद्र औटी, सचिव पोपट धामणे, बन्सी गुंड, राजेंद्र ठुबे, साहेबराव मले, रमेश शिंदे, विजय राऊत, किरण माने, शिवाजी आव्हाड, अनिल घोलप, भाऊराव नागरे, बळीराम जाधव, नारायण लहाने, खंडु बाचकर, दादासाहेब गव्हाणे, अजय लगड, रमेश सुपेकर, बाबा बोरसे, बप्पासाहेब शेळके, राजीव शिंदे, संजय हरकळ, विजय अंधारे, विष्णू बोडके, मेहबूब शेख, दत्तू फुंदे, बळीराम जाधव, सुभाष फसले , गजानन मुंडलिक, अमोल चन्ने, आबासाहेब बिडगर, सुखदेव ढवळे, संतोष वांढरे, दत्तात्रय दिघे, फटांगरे, एकनाथ साबळे, सुनील मेचकर, भारत तोरमल, सचिन लोंढे, रावसाहेब तांबे, श्रीकांत दळवी, सचिन रनाते, नंदकुमार खंडागळे आदींनी केले आहे.

## राज्य सॉफ्टबॉल संघात सिध्दी तांबे हिची निवड

**नायक वृत्तसेवा, शिर्डी**

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित शिर्डी येथील संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या सिध्दी महेंद्र तांबे हिची १७ वर्षे वयोगटात महाराष्ट्राच्या सॉफ्टबॉल मुलींच्या संघात निवड झाली. ही निवड महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद, पुणे व विभागीय क्रीडांगण, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे झाली. या निवडीसाठी राज्यातील १६० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यात १६ खेळाडूंची निवड करण्यात आली. यात सिध्दीचा समावेश आहे.

संजीवनीच्या सॉफ्टबॉल मुलींच्या संघाने जिल्हा व



विभागीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करीत राज्य पातळीवरील स्पर्धेत थेट प्रवेश मिळविला. यात सिध्दीने आपल्या खेळाचे कसब दाखवत राज्य निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. सिध्दीच्या माध्यमातून संजीवनीला राज्याचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सिध्दी आता महाराष्ट्र संघातून खेळणार आहे. या यशाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सिध्दी तांबे, तिचे वडील महेंद्र तांबे, आई पुर्णिमा तांबे यांचे अभिनंदन करून सिध्दीला राष्ट्रीय स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या. संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या संचालिका डॉ. मनाली अमित कोल्हे यांनी सिध्दी व तिच्या आई-वडीलांचा सत्कार केला. यावेळी प्राचार्या रीना राजपूत, क्रीडाशिक्षक विरूपक्ष रेड्डी आदी उपस्थित होते.

## देशी गाय नैसर्गिक शेतीचा पाया : कुलगुरू खर्चे

**नायक वृत्तसेवा, देवळाली प्रवरा**

नैसर्गिक शेतीचा पाया म्हणजे देशी गाय. देशी गायींचे संवर्धन, विविध जातींचे संरक्षण आणि वैज्ञानिक पद्धतीने संगोपन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

पुणे कृषी महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट देत खर्चे यांनी संशोधन, संवर्धन आणि तंत्रज्ञाननिर्मितीच्या कार्याची सखोल पाहणी केली. केंद्रात जोपासण्यात येणाऱ्या सहिवाल, गीर, राठी, थारपारकर, लाल सिंधी या दुधाळ गोवंशांसह खिलार, लाल कंधारी, देवणी, गवळाऊ,



कोकण कपिला, डांगी, पुंगनूर या स्थानिक व दुर्मिळ जातिवैविध्याचे त्यांनी निरीक्षण केले. कुलगुरूंनी दूध उत्पादन व प्रक्रिया युनिट, बायोगॅस संयंत्र, सौरऊर्जा युनिट, शेण-गोमूत्र प्रक्रिया केंद्र, आयुर्वेदिक औषधींची 'धन्वंतरी बाग', वातावरण नियंत्रित गोठा, गोपरिक्रमा रस्ता, तसेच केंद्राने विकसित केलेले एकात्मिक गोपालन मॉडेल यांची पाहणी केली.

केंद्रात कृषिविद्या, मृदाशास्त्र, कृषी सूक्ष्म जीवशास्त्र, कीटकशास्त्र, वनस्पती विकृतीशास्त्र,कृषी अभियांत्रिकी, कृषी अर्थशास्त्र, कृषी विस्तार अशा सर्व शाखांचे एकत्रित संशोधन सुरू असल्याने या केंद्राचे कार्य अधिक महत्त्वाचे बनल्याचे त्यांनी नमूद केले. त्यातील वैज्ञानिक निष्कर्ष व नवकल्पना जागतिक पातळीवर पोहोचवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. भेटीदरम्यान सेंटर ऑफ एक्सलन्सच्या सुरू असलेल्या बांधकामाचीही त्यांनी पाहणी करीत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. यावेळी डॉ. महानंद माने (सहयोगी अधिष्ठाता), केंद्रप्रमुख डॉ. सोमनाथ माने यांनी संपूर्ण माहिती सादर केली. तसेच डॉ. धीरज कंखरे, डॉ. संतोष मोरे, डॉ. ताई देवकाते, डॉ. मृणाल अजोतीकर, डॉ. विकास भालेराव, डॉ. सुजित भालेराव, विद्या पिंपरकर आदी उपस्थित होते. केंद्रात नैसर्गिक शेतीसंदर्भातील अभ्यासक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम त्वरित सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना कुलगुरूंनी दिल्या. त्या अनुषंगाने विविध तांत्रिक दस्ताऐवज, प्रशिक्षण पद्धती व शेतकऱ्यांसाठी उपयुक्त मॉडेल्स तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

नायक ANCHOR

## बाळासाहेब वाघ व किरण मदने यांचा कार्यगौरव पुरस्काराने सन्मान

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

शिर्डीत नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय नाभिक वधू-वर-पालक परिचय मेळाव्यात येथील राष्ट्रीय नाभिक एकता महासंघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब वाघ व प्रवक्ते किरण मदने यांचा कार्यगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

समाजातील संघटन, सामाजिक बांधिलकी आणि जनजागृती या त्यांनी केलेल्या कार्यासाठी हा पुरस्कार त्यांना



प्रदान करण्यात आला. या दोघांनी संगमनेर तालुक्याबरोबर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या समस्या आणि सामाजिक प्रश्नांची उकल करण्याचे काम केले त्याचबरोबर समाजातील युवक, युवतींना सामाजिक उपक्रमात सहभागी करून त्यांना जबाबदारीच्या कामाची वाटणी केली.

यावेळी नाभिक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष भगवान बिडवे, प्रदेश कार्याध्यक्ष किरण बिडवे, जिल्हाध्यक्ष साईभक्त मनोज वाघ, नाभिक समाज वधु-वर समिती, आयोजन समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजाच्या विश्वासाला पात्र ठरू असे आश्वासन त्यांनी दिले. तालुक्यातून विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## यश नवले याची जैसलमेर राजस्थान इंडियन आर्मीत नियुक्ती

**नायक वृत्तसेवा, अकोले**

येथील अगस्ती महाविद्यालयाचा विद्यार्थी एन् सी सी कॅडेट यश सुरेश नवले याची नुकतीच जैसलमेर राजस्थान इंडियन आर्मीत निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. भास्कर शेळके आणि एन् सी सी प्रमुख कॅप्टन डॉ. सचिन पलांडे यांनी दिली.

यश नवले याने गार्ड रेजिमेंटचे प्रशिक्षण पूर्ण केले असून त्याची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. यश नवलेच्या या अभिमानास्पद कामगिरी बद्दल



अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इंजि. सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर यांनी संस्थेच्या वतीने संस्था कार्यालयात त्याचा यथोचित सत्कार केला. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त, माजी आमदार वैभव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, स्विकृत विश्वस्त मधुकर सोनवणे, सुरेश कोते, संपत वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांनी यश नवले याचे अभिनंदन केले आहे.

पाहिजेत
Dr. R. S. Gunjal welfare foundation
College of nursing

| अ. नं. | पद | जागा |
| --- | --- | --- |
| १) | Principal (M.Sc Nursing with 15 year teaching experience, PHD is Desirable ) | 1 |
| २) | Tutor (B.Sc Nursing) | 4 |
| ३) | Staff Nurs (B.Sc Nursing) | 2 |
| ४) | Driver (Ladies) | 1 |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर Mb :- 8237660432 / 8468816440

बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे
कन्सल्टंट जनरल अँड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे
स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
राजेन्द्र

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास ६८ शब्दात हे अत्यंत खेदजनक!

## आ. सत्यजित तांबे यांनी ओढले शिक्षण विभागाच्या कारभारावर ताशेरे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण हिंदुस्तानचे आराध्य दैवत आहे. उत्तम प्रशासक, लोकशाही राज्यपद्धती, आदर्श संस्कार देणारे महाराज असे सर्वगुणसंपन्न छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा देशातील सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण कळायला पाहिजे. याकरता महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाने व सरकारने ठोस पावले उचलने गरजेचे आहे. मात्र वारंवार मागणी करूनही सरकार याबाबत उदासीन आहे. हे दुर्दैवाचे असून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सीबीएससी पॅटर्न मध्ये फक्त ६८ शब्दांचा आहे. हे राज्यातील सर्व नागरिकांसाठी अत्यंत खेदजनक असल्याचे मत आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केले.



नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सीबीएससी पॅटर्न मध्ये अवघ्या ६८ शब्दांमध्ये असलेल्या इतिहासावर नाराजी व्यक्त करताना आमदार तांबे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नाही तर संपूर्ण देशाचे आराध्य दैवत आहे. त्यांची राजनीति, युद्ध कौशल्य, साहस, लोकशाही राजनीती, स्त्रियांचा आदर, आदर्श संस्कार असे सर्व पैलू हे देशातील सर्व विद्यार्थ्यांना कळायला पाहिजे. याकरता छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा सीबीएससी पॅटर्नमध्ये विस्तीर्ण असला पाहिजे मात्र तो सध्या इयत्ता पहिली ते दहावी अवघ्या ६८ शब्दांचा आहे, हे महाराष्ट्रातील आणि देशातील प्रत्येक नागरिकांसाठी अत्यंत खेदजनक आणि दुर्दैवी आहे.

याबाबत आपण मागील अधिवेशनामध्ये सुद्धा मागणी केली होती मात्र शालेय शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाबाबत पूर्णपणे उदासीन आहे. शिक्षण विभागाला शिक्षण सोडून इतर कामांमध्ये रस आहे असे दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड समाजातील सर्वांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण केले. महाराजांनी ऐश्वर्य नाही तर जनतेचे राज्य निर्माण केले. त्यांचा इतिहास अवघ्या ६८ शब्दांमध्ये आणि देशातील अनेक महाराजांचा ज्यांनी मोठ - मोठे महाल बांधले त्यांचा इतिहास मात्र सविस्तर आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ३०० वर्षांपूर्वी बांधलेले गड किल्ले आजही सुरक्षित आहेत मात्र राज्य सरकारने तीस वर्षांपूर्वी बांधलेल्या इमारती आणि रस्ते यांची काय अवस्था आहे हे सर्व जनतेला माहिती आहे. कोणतीही अडचण निर्माण झाली तर ती सोडवण्याची ताकद शिवचरित्रामध्ये आहे आणि म्हणून छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्येक तालुक्यात आणि जिल्ह्यात झाले पाहिजे. अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करण्याबाबत काय झाले तो प्रश्न अनुत्तरीत आहे. याचबरोबर गड किल्ले संवर्धनासाठी दरवर्षी मोठा निधी दिला जातो, त्याचे काय होते हाही प्रश्न आहे.

२००६-७ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठांमध्ये मराठी भाषा अध्यासन केंद्राकरिता एक कोटी रुपयांचा निधी दिला होता. खरे तर महाराष्ट्र पर्यटन, महाराष्ट्र संस्कृती, महाराजाचा इतिहास हा संपूर्ण जगामध्ये गेला पाहिजे, याकरता राज्य सरकारने तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी केली. यावर शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोईर यांनी उत्तर दिले असून महाराष्ट्रातील शिष्टमंडळ केंद्रीय शिक्षण मंत्री यांना भेटून महाराजांचा इतिहास हा सीबीएससी पॅटर्न मध्ये असावा ही मागणी करणार असल्याचे ते म्हणाले.

■ माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथील बसस्थानकासमोर भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी आम्ही प्रस्ताव केला आहे. या करता एक कोटी रुपये निधीची मागणी केली मात्र जिल्हा नियोजन समितीने याबाबत निधी देता येतो की नाही असा अहवाल नगरविकास विभागाकडून मागवला मात्र त्यावर अद्याप काहीही उत्तर मिळाले नाही. यावर डॉ. भोईर म्हणाले की, हा निधी देण्याचा अधिकार जिल्हा नियोजन समितीला आहे. त्यावर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, तुम्ही आमचे पालकमंत्री यांना याबाबत सांगा.

श्री गणेश
शिलाई मशिन
शिलाई मशिन विक्री व दुरुस्तीचे विश्वसनीय ठिकाणी...!
पुणे - नाशिक हायवे, नवघर गल्ली, संगमनेर जि. अ. नगर 9822558815

नायक ANCHOR

## प्रीमियर लीग मुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठी संधी : डॉ. जयश्री थोरात



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

क्रिकेट हा भारतामध्ये आणि जगामध्ये अत्यंत लोकप्रिय खेळ ठरला आहे. संगमनेर तालुक्यातील अजिंक्य रहाणे, पुनम खेमनर हे राष्ट्रीय पातळीवर खेळत असून क्रिकेटमुळे सांघिक भावना वाढते. क-हे येथे मागील चार वर्षापासून होत असलेल्या प्रीमियम लीगमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठी संधी मिळत असल्याचे प्रतिपादन युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी केले.

तालुक्यातील क-हे फाटा येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात मित्र मंडळ निमोण, तळेगाव गट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौथ्या प्रीमियम लीगच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी समवेत थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात, आर्किटेक्ट बी. आर. चकोर, जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष सुभाष सांगळे, सरपंच सुभाष सानप, जेष्ठ कार्यकर्ते देवराव गुळवे, भास्कर तपासे, सुनील सानप, संतोष डोंगरे, भाऊसाहेब गीते, कीर्ती जायभाये, सुनील थोरात यांच्यासह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. थोरात म्हणाल्या की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व स्व. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची राजकारणा पलीकडची मैत्री होती. विलासराव देशमुख व गोपीनाथ मुंडे यांची मैत्री म्हणजे आनंदाचे पर्व. महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकारणाचा विचार आपल्या सर्व युवकांना पुढे न्यायचा आहे. क्रिकेट खेळामुळे सांघिक भावना वाढीस लागते, याबरोबर आरोग्य चांगले राहते. व्यसनांपेक्षा छंद जोपासावा आणि मोबाईल पेक्षा मैदानावर खेळा, कारण आरोग्यासाठी ते अत्यंत चांगले आहे. मागील चार वर्षापासून सह्याद्रीच्या पायथ्याशी अत्यंत रम्य वातावरणात ही स्पर्धा होत असून ही प्रीमियम लीग दोन जिल्ह्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरली आहे. यामुळे दोन्ही जिल्ह्यातील युवकांना मोठी संधी मिळाली असल्याचे त्या म्हणाल्या.

इंद्रजीत थोरात म्हणाले की, नाशिक आणि नगर जिल्ह्याच्या सीमेवर क्रिकेटची मेजवानी ही क्रीडाप्रेमींसाठी मोठी आनंदाची बाब आहे. नाशिक-पुणे महामार्गावरून जाणारे अनेक प्रवासी या स्पर्धेचा आनंद घेत असतात. उत्कृष्ट आयोजक आणि राज्य पातळीवरील खेळाडू यांचा सहभाग यामुळे ही स्पर्धा अत्यंत लोकप्रिय झाली असल्याचे ते म्हणाले.

इंजिनीयर सुभाष सांगळे म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली मागील चार वर्षापासून या प्रीमियम लीगचे आयोजन होत असून यामध्ये नाशिक व नगर जिल्ह्यातील अनेक खेळाडू सहभागी होत आहेत. दर्जेदार आयोजनामध्ये स्थानिक युवकांचा मोठा सहभाग असून त्या सर्व युवकांच्या सहकार्याने ही स्पर्धा आता राज्य पातळीवर नेण्यासाठी आपला प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

यावेळी वृद्ध, नागरिक, युवक, महिला व खेळाडूंची मोठी उपस्थिती होती. पुढील आठ दिवस या स्पर्धा सुरू राहणार असून या क्रिकेट स्पर्धांचा जास्तीत जास्त नागरिकांनी आनंद घ्यावा असे आवाहन क-हे ग्रामस्थ, युवक मंडळ, लोकनेते गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान व माजी मंत्री बाळासाहेब थोरात मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

TVS iQUBE ELECTRIC
TVS
GANDHI TVS
Sangamner 916814 1919 750726 8181
Akole 7798576161 9975554999

ROHNY
Now In Sangamner
Branches: Nashik I Ch. Sambhaji Nagar I Ahilya Nagar I Pimpri-Chinchwad
0253 2454140 / 7498292802
TOP TEN IMPERIAL
S-5 Second Floor, Sangamner, 422 605, Dist. Ahilyanagar
www.rohnyelevators.com

दर्शन
टेक्सटाईल मार्केट
सेले नव्हे होलसेल सेल
मानसून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या लुकला देऊन जा ट्रेंडी टच
खास लेडीज सूट्स सह
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

मंडळी आमची निवड करा
आर्थिक स्वप्नपूर्तीचा मार्ग आम्ही तुम्हाला दाखवू!
MUTUAL FUNDS
कडलग इन्व्हेस्टमेंट
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर,
9150 306 306
9142 559 000
म्युच्युअल फंड्स । एस.आय.पी. । सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन । टर्म लाईफ इन्शुरन्स । मेडीक्लेम

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
Hotel Nature Family Restaurant 8983220619
Khandarmal, Pune - Nashik Highway sangamner
Call : 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HALL RESTAURANT ROOMS CONFERENCE PAD
natureagroresort@gmail.com www.natureagroresort.com

कुटे हॉस्पिटल अँण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५

पान ३ वरुन

**रेल्वेमार्गावरुन 'संभ्रम' निर्माण झाल्याचे नामदार विखेंचे पत्र!**

संसदेतील रेल्वेमंत्र्यांच्या उत्तराने अहिल्यानगर जिल्ह्यात संभ्रम झाला असून कोणत्याही लोकप्रतिनिधीला विश्वासात न घेता मूळ संरचनेत बदल झाल्याने त्याचा रोष सहन करावा लागत आहे. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पात प्रस्तावित रेल्वेमार्गात कोणताही बदल करण्याची घोषणा करण्यापूर्वी पुणे-नाशिक व्हाया संगमनेर मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींशी चर्चा करावी असे आवाहनही नामदार विखे यांनी पत्राद्वारे केले आहे. त्यामुळे जवळजवळ बांसनात गेलेल्या या रेल्वेमार्गाने पुन्हा एकदा धुगधुगी वाढवली आहे.

याबाबत नामदार राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या कार्यालयाकडून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकातून रेल्वेमंत्र्यांशी पत्रव्यवहारा बाबतची माहिती देण्यात आली आहे. पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वमार्गासंदर्भात सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतल्याशिवाय कोणतेही निर्णय करु नयेत, प्रस्तावित रेल्वेम ार्गाच्या बदलाबाबत झालेला संभ्रम दूर करण्यासाठी तातडीने बैठक बोलवावी अशी विनंती रेल्वेमंत्र्यांना करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

संसंदेच्या चालू हिवाळी अधिवेशनात गेल्या बुधवारी (ता.३) पुणे-नाशिक रेल्वेमार्गाबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या उत्तरात प्रस्तावित मार्गात बदल करुन शिर्डीमार्गे नवा मार्ग प्रस्तावित केल्याची बाब समोर आल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांसह लोकप्रतिनिधींमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकल्पाच्या मूळ आराखड्यानुसार नारायणगाव, संगमनेर, सिन्नर, नाशिक या भागातून रेल्वेमार्ग निश्चित करण्यात आला आहे. त्यासाठी भूसंपादनही करण्यात आले होते. मात्र त्या उपरांतही रेल्वेम ार्गात अचानक झालेला बदल आश्चर्यकारक असल्याचा उल्लेखही पत्रात असल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हंटले आहे.

यापूर्वी तयार करण्यात आलेल्या रेल्वेप्रकल्पाच्या आराखड्यातील बदलांबाबत जिल्ह्यातील कोणत्याही लोकसभा अथवा विधानसभा सदस्यांशी कोणतीही चर्चा करण्यात आलेली नाही. प्रकल्प मार्गात बदल करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे अतिशय आवश्यक आहे. परंतु, तशी कोणतीही चर्चा न झाल्याने लोकप्रतिनिधींसह जनतेमध्ये रेल्वेमार्गाबाबत म ोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या संभ्रमाच्या वातावरणाचा रोष लोकप्रतिनिधींना सहन करण्याची वेळ आली असल्याने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी विनंतीही या पत्राद्वारे रेल्वेमंत्र्यांना करण्यात आली आहे.

प्रस्तावित रेल्वेमार्गाबाबत पहिल्यापासून असलेली मागणी विचारात घेण्यासाठी आपण तातडीने सर्व लोकप्रतिनिधींची बैठक बोलवावी. तसे, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतल्याशिवाय नाशिक-पुणे रेल्वेबाबत कोणताही निर्णय घेवू नये अशी विनंतीही राज्याचे जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठवलेल्या पत्रात केल्याने जवळजवळ बांसनात गुंडाळल्या गेलेल्या या रेल्वेप्रकल्पाची धुगधुगी पुन्हा वाढली आहे.

**रेल्वे असतानाही पळवापळवी कशाला? : माजीमंत्री थोरात**

पिढ्यांचे कल्याण होईल, त्यांच्या जीवनात संपन्नता येईल यासाठी पुणे–नाशिक रेल्वेमार्ग महत्वाचा असल्याचे सांगताना तालुक्यातील दुष्काळीभागातील कृषीमाल महानगरांमध्ये पाठवता यावा यासाठी सोनेवाडीजवळ मालधक्का उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिल्याचा दाखलाही दिला. उत्तरेतील श्रीरामपूर, शिर्डी व कोपरगावला आधीपासूनच रेल्वेमार्ग आहे, मग संगमनेरहून जाणारी रेल्वे पळवण्याचे कारण काय? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

नैसर्गिक पद्धतीने व्हाया संगमनेर, सिन्नर जाणाऱ्या या रेल्वेमार्गासाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादनही झाले आहे आणि त्याचा मोबदलाही शेतकऱ्यांना मिळाला आहे. असे असतानाही रेल्वेमार्ग फिरवण्याचा प्रकार अतिशय दुर्दैवी असल्याचे माजीमंत्री थोरात म्हणाले. अकोल्यातील नागरिकांनी हा रेल्वेमार्ग त्यांच्याकडून नेण्यासाठी आंदोलन छेडल्याच्या विषयावर त्यांनी अकोलेकरांच्या मागणीला विरोध नसल्याचे स्पष्ट केले. रेल्वमंत्र्यांनी कोणतेही राजकारण न आणता नैसर्गिक न्यायाने पुढील दहा–वीस नव्हेतर शंभर वर्षांचा विचार करुन नागरिकांना सुलभता आणि संपन्नता मिळेल असा निर्णय घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

**एक कोटीचा गांजा तस्कर अखेर गजाआड!**

हस्तगत केला असून पाचजणांना अटक केली आहे. या कारवायांमधून शहराला गांजा तस्करांचा विळखा पडल्याचेही स्पष्ट झाले असून पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची प्रामाणिक चौकशी झाल्यास गांजा तस्करीचे संपूर्ण नेटवर्क उध्वस्त होण्याची शक्यता आहे.

राज्याच्या वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना संगमनेरातील गांजा तस्करीचा सुगावा लागल्यानंतर त्यांनी नाशिक आणि पुण्याच्या अमलीपदार्थ विरोधी टास्क फोर्सला कारवाईचे आदेश दिले होते. टास्क फोर्सच्या नाशिक विभागाचे उपअधिक्षक गुलाबराव पाटील यांनी कारवाईचे नेतृत्व करताना बुधवारी रात्रीपासूनच सुकेवाडी परिसरावर लक्ष केंद्रीत केले होते. गुरुवारी सकाळी सुकेवाडीतील मोठेबाबा मंदिरालगत प्रत्यक्ष कारवाई करताना संयुक्त पथकांनी तुषार उर्फ दमल्या पडवळ याने आपल्या घरातच निर्माण केलेले गांजाचे गोदाम उघड करीत तब्बल ४५६ किलो गांजा हस्तगत केला. आरोपी मात्र छाप्यापूर्वीच ऊसाच्या आडोशाने पसार झाला.

या कारवाईने जिल्हा हादरला असताना त्याचे पडसाद थेट विधानसभेतही उमटले आमदार अमोल खताळ यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर गृहराज्यमंत्र्यांनी दोषींना सोडणार नसल्याचे उत्तर दिल्याने संगमनेरचे गांजा प्रकरण 'हॉट' झाले. त्यातच काल (ता.१२) शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने गुंजाळवाडी शिवारातील गोल्डनसिटीत छापा घालून आणखी एका गांजा गोदामाचा भंडाफोड करीत ३२ किलो ८४५ ग्रॅम गांजा हस्तगत करुन शुभम चंद्रकांत जाधव (वय २८, रा.इंदिरानगर, गल्ली नं.१), विशाल अशोक गायकवाड (वय २२, रा.जनतानगर गल्ली नं.१), प्रथमेश अशोक पावडे (वय २२, रा.इंदिरानगर गल्ली नं.४) व परवेझ दाऊद शेख (वय २६, रा.साईश्रद्धा चौक गल्ली नं.१, घुलेवाडी) अशा चौघांना अटक केली.

अलिकडच्या काळात जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणात गांजा सापडण्याची ही पहिलीच वेळ असल्याने आणि इतकी पक्की माहिती असतानाही सुकेवाडी प्रकरणातील आरोपी पसार होण्यात यशस्वी ठरल्याने पोलिसांच्या कारवाईबाबतही साशंकता होती. त्यातून पसार आरोपीचा शोध घेण्याचा दबावही वाढत गेला. अखेर आज (ता.१३) पहाटे आरोपी तुषार उर्फ दमल्या उत्तम पडवळ (वय २७, रा.सुकेवाडी) हा घुलेवाडी परिसरात असल्याचा सुगावा लागताच प्रकटीकरण शाखेचे उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांनी छापा घालीत त्याच्या मुसक्या आवळल्या. आज त्याला न्यायालयासमोर हजर केले जाणार आहे.

गेल्या दोन दिवसांतील या कारवायांमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात गांजा हस्तगत झाल्याने शहरातील पालकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या छाप्यांमधून पोलिसांनी एकूण पाचजणांना अटकही केली असून त्यातील चौघे शुक्रवारपासून तर, सुकेवाडी प्रकरणातील पडवळ आजपासून पोलीस कोठडीत जाणार आहे. पोलिसांनी या पाचही जणांची प्रामाणिकपणे चौकशी केल्यास संगमनेर भोवती निर्माण झालेले गांजा तस्करीचे नेटवर्क उघड होण्याची शक्यता आहे. मात्र मागील काही प्रकरणांचा तपास पाहता शहर पोलिसांकडून गांजा प्रकरण किती गांभीर्याने घेतले जाते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# संगमनेरमार्गे रेल्वेसाठी आ. सत्यजित तांबे अधिवेशनात आक्रमक!

## शासनाकडून ३१६ कोटींची उधळपट्टी; मग रेल्वे शिर्डी मार्गे का पळवली?

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



मुंबई-नाशिक- पुणे सुवर्ण त्रिकोणामध्ये संगमनेर येत असून नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे करता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने मोठा पाठपुरावा केला. यानंतर रेल्वे मंजूर होऊन १०० हेक्टर जमिनीचे अधिग्रहण झाले. मग आता रेल्वे मार्ग का बदलला? असा सवाल करत नाशिक- पुणे हायस्पीड रेल्वे ही संगमनेर मार्गे च झाली पाहिजे अशी आग्रही आणि आक्रमक मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी सभागृहात केली.

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वेचा प्रश्न आमदार सत्यजित तांबे यांनी आक्रमकपणे उचलून धरला. यावेळी सभागृहात विधान परिषदेचे सभापती ना. प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध मंत्री व इतर सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे करता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मोठा पाठपुरावा केला. त्या माध्यमातून रेल्वे मंजूर झाली. राज्य शासन महारेल विभागाच्या वतीने रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण झाले. या रेल्वेमार्गाकरता १०० हेक्टर जमिन अधिग्रहण झाली असून राज्य शासनाकडून ३१६ कोटी रुपये खर्च झाला आहे. हा मार्ग अत्यंत नैसर्गिक आणि सोयीस्कर असताना आता मार्ग बदलण्याचा घाट घातला जात आहे.

नाशिक-सिन्नर- संगमनेर- जुन्नर- नारायणगाव- खेड- चाकण असा हा मार्ग अत्यंत गरजेचा आणि योग्य आहे. या मार्गावर छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेला शिवनेरी किल्ला सुद्धा आहे. त्यामुळे शिवनेरी किल्ला त्याचबरोबर अष्टविनायकांमधील ओझर आणि लेण्याद्री हे तीर्थस्थळ सुद्धा जोडता येणार आहे.

मात्र आता शिर्डी अहिल्यानगर हा मार्ग कोणत्या उद्देशाने झाला. हे काही कळत नाही. या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र घेऊन राज्य शासनाने केंद्राकडे पाठपुरावा करून हा मार्ग संगमनेर मार्गेच केला पाहिजे ही आमची आग्रही मागणी आहे. आणि याशिवाय ३१६ कोटी रुपये खर्च करून राज्य सरकारने जी १०० हेक्टर जमीन ताब्यात घेतली आहे. त्याचे राज्य सरकार काय करणार आहे हा मोठा प्रश्न आहे.

शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर रेल्वेचे नाव लागले आहे. शेतकरी हे पैसे परत देऊ शकणार नाही. मग ३१६ कोटी रुपयांची उधळपट्टी केल्यानंतर मार्ग बदलण्याची गरज काय? असा सवाल त्यांनी राज्य सरकारला विचारला. याचबरोबर या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींना घेऊन केंद्राकडे जाऊन तातडीने हा मार्ग संगमनेर मार्गेच झाला पाहिजे यासाठी सरकारने पाठपुरावा केला पाहिजे अशी आग्रही मागणी विधान परिषदेमध्ये त्यांनी केली.

यावर राज्य सरकारच्या वतीने राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी उत्तर दिले, राज्य सरकार या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींना घेऊन केंद्राकडे जाण्यासाठी प्रयत्न करेल असे उत्तर त्यांनी दिले.या उत्तरावर समाधान न झाल्याने आमदार सत्यजित तांबे चांगलेच आक्रमक झाले होते.

- माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक– पुणे हायस्पीड रेल्वे ही संगमनेर मार्गेच झाली पाहिजे. याकरता आमदार सत्यजित तांबे यांनी सर्वपक्षीय नागरिकांची बैठक घेतली असून या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींची ते बैठक घेणार आहेत. सोशल मीडिया कॅम्पियन, सह्यांची मोहीम, ऑनलाइन ई–मेल असे जन आंदोलन सुरू असून अधिवेशनामध्ये सुद्धा आमदार तांबे यांनी आक्रमक पद्धतीने रेल्वेची मागणी लावून धरली आहे. राजकारण न करता सर्वांनी संगमनेर मार्गे रेल्वे करता पाठिंबा द्यावा असे आवाहन रेल्वे समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# विहिरीत अडकलेल्या बिबट्याची सुखरूप सुटका!

## दुसऱ्या बिबट्याच्या दर्शनाने मात्र ग्रामस्थ भयभीत

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**



संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील खैरे वस्तीवर शुक्रवारी एक थरारक घटना समोर आली असून येथील एका विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभाग आणि ग्रामस्थांच्या मदतीने शर्थीचे प्रयत्न करून जेरबंद करण्यात आले. मात्र, एका बिबट्याला विहिरीतून काढले जात असतानाच जवळच्या तळ्यावर दुसरा बिबट्या दिसल्याने परिसरात पुन्हा एकदा भीतीचे वातावरण पसरले आहे.

पानोडी - हजारवाडी रस्त्यावरील खैरे वस्ती येथे रखमा तान्हाजी खैरे यांचे गट नं ३३४ क्षेत्र आहे. गुरुवारी रात्रीच्या सुमारास शिकारीच्या शोधात असताना एक बिबट्या त्यांच्या विहिरीत पडला. मात्र, ही बाब कोणाच्याही लक्षात आली नाही. शुक्रवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास मंदा रखमा खैरे या विहिरीवर विद्युत पंप चालू करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी विहिरीजवळ जाताच त्यांना अचानक बिबट्याच्या डरकाळीचा आवाज आला. घाबरलेल्या मंदा खैरे यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता, त्यांना पाण्यात बिबट्या दिसला. त्यांनी तात्काळ आरडाओरडा करून पती रखमा खैरे आणि आजूबाजूच्या रहिवाशांना आवाज दिला. त्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली.

ग्रामस्थांनी घटनेची माहिती संगमनेर वनविभागाला दिली. माहिती मिळताच वनाधिकारी सुभाष सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक रामेश्वर मंडपे, भाऊसाहेब साळवे तसेच वन कर्मचारी सुकदेव सूळ, संजय गागरे, नजीर शेख, उत्तम भूसारी आणि रवि पडवळे यांचे पथक पिंजरा घेऊन घटनास्थळी दाखल झाले. तर स्थानिक रावसाहेब घुगे, बाळासाहेब नागरे, पांडूरंग साबळे, बाळू सानप, कैलास नागरे, रविंद्र खंडाळे व इतर ग्रामस्थांच्या मदतीने बचावकार्य सुरू करण्यात आले. साधारणतः दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर बिबट्याला विहिरीबाहेर काढून पिंजऱ्यात जेरबंद करण्यात यश आले. वनरक्षकांच्या अंदाजानुसार, हा बिबट्या गुरुवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास विहिरीत पडला असावा, त्यामुळे तो जवळपास २४ तास पाण्यात मृत्यूशी झुंज देत होता.

एकीकडे विहिरीतून एका बिबट्याला बाहेर काढण्याचे काम सुरू होते, तर दुसरीकडे एक धक्कादायक प्रकार घडला. शेजारीच असलेल्या तळ्यावर काही तरुणांना आणखी एक बिबट्या दिसून आला. या बिबट्याने तरुणांवर पाहून गुरगुरण्यास सुरुवात केल्याने एकच घबराट उडाली.

विहिरीतील बिबट्या जेरबंद झाला असला तरी, तळ्यावर दिसलेल्या दुसऱ्या बिबट्यामुळे खैरे वस्ती आणि पानोडी परिसरात दहशत कायम आहे. तळ्यावरील रस्ता हा एकमेव असून, याच मार्गावरून शाळकरी मुले शाळेत जातात. आता तिथेच बिबट्याचे वास्तव्य असल्याने मुलांच्या आणि नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने या भागात दुसरा पिंजरा लावून या बिबट्यालाही जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# संवेदनशील मित्रत्वातून कृतिशील दातृत्वाचा आदर्श

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

अंतरंगात संस्कार, क्षमाशीलता, करुणा, सहृदयता, सहवेदना व दातृत्व यांचे अधिष्ठान असेल, तर हातून सत्कार्यच घडते, याची प्रचिती नुकतीच आयुष्यभर ज्ञानदान करणाऱ्या शिक्षक-शिक्षिकांनी कृतीतून दाखवून दिली. संगमनेर येथील गोखले एज्युकेशन संस्थेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून ज्ञान व संस्कारांची शिदोरी घेऊन बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांनी ३५ वर्षांपूर्वीच्या मैत्रीचे ऋण जपत सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श घडवला.

बी. एड. प्रशिक्षण काळात प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या आपल्या वर्गमित्राचे, कै. बद्रिनाथ बैरागी यांचे आकस्मिक निधन झाल्याचे समजताच सर्वजण हळहळले. या दुःखद प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार द्यावा, या उदात्त हेतूने माजी वर्गमित्रांनी पुढाकार घेतला. सुमारे ५१ जणांनी एकत्र येत ६१ हजार ३८८ रुपयांची मदत संकलित करून कुटुंबीयांकडे सुपूर्द केली.

शिक्षक म्हणून हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात आदर्शांचे व संस्कारांचे बीजारोपण करणाऱ्या या माजी विद्यार्थ्यांनी ज्ञान, कर्म व कर्तव्य यांच्या समिधा अर्पण करत ज्ञानयज्ञ तेवत ठेवला आहे. आजच्या व्यवहारी जगात ३५ वर्षांपूर्वीच्या वर्गमित्राबद्दलची कणव कृतीतून सिद्ध करत त्यांनी सामाजिक बांधिलकीचा वस्तुपाठ घालून दिला आहे.

# मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय!

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश करत पोलिस अधिक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (एएचटीयु) पथकाने नगर शहरात धाडसी कारवाई केली. या कारवाईत ५ महिलांची सुटका करण्यात आली असून, कुंटणखाना चालकासह एका ग्राहकाला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर–मनमाड रोड लगत सावेडी परिसरातील साई मिडास इमारतीत असलेल्या ॲक्युम मसाज पार्लर ॲण्ड स्पा सेंटर येथे मसाजच्या आड वेश्याव्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कालुबर्मे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी तातडीने कारवाईचे आदेश अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांना दिले.

# के. बी. रोहमारे यांच्या सारख्या तत्त्वनिष्ठ राजकारण्यांची गरज : कांबळे

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**

महाराष्ट्राच्या राजकीय चारित्र्याचा, नैतिकतेचा व मूल्यांचा इतिहास कुणाला लिहावासा वाटला, तर त्या पुस्तकातील खूप जागा के. बी. रोहमारे यांचे व्यक्तिमत्व घेईल. आजच्या राजकारणातील नागवेपण संपवायचे असेल, तर केबींसारख्या तत्त्वनिष्ठ राजकारण्यांची गरज असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी केले.

के. जे. सोमैया वरिष्ठ व के. बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या साकरबेन सोमैया सभागृहामध्ये आयोजित माजी आमदार स्व. के. बी. रोहमारे यांच्या २८ वे पुण्यस्मरण व भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे होते. भि. ग. रोहमारे ट्रस्टचे अध्यक्ष अशोक रोहमारे व सचिव रावसाहेब रोहमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कांबळे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब भारदे, नागनाथ आण्णा नाईकवाडी, मारुतराव घुले पाटील, भाऊसाहेब थोरात आदींच्या सानिध्यात के. बी.ची वैचारिक जडणघडण झाली होती.







'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी–१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर – ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.




# नायलॉन, चायनीज मांजा विक्री-वापरावर बंदी; अपर जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे आदेश

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



आगामी मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून व त्या अनुषंगाने होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात नायलॉन व चायनीज मांजाच्या खरेदी-विक्रीसह, साठवणूक व वापरावर १२ डिसेंबर २०२५ ते १७ जानेवारी २०२६ पर्यंत संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (१) अन्वये हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने सुमोटो याचिका क्र. ०८/२०२० मध्ये नायलॉन मांजामुळे होणारी जीवितहानी टाळण्यासाठी अशा मांजावर बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. याच निर्देशांचे पालन करत आणि पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या प्रस्तावानुसार जिल्हा प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

मकर संक्रांतीच्या काळात मोठ्या प्रमाणावर पतंग उडवले जातात, काही व्यापारी नायलॉन व चायनीज धाग्याची विक्री करतात. हा मांजा अत्यंत धारदार असल्याने पतंग उडविणाऱ्यांच्या हाताला इजा होण्याची तसेच तुटलेला मांजा रस्त्यावर पडल्यास दुचाकीस्वार, पादचारी आणि लहान मुले अडकून गंभीर जखमी होण्याची दाट शक्यता असते. याशिवाय, हा मांजा विद्युत वाहिन्यांवर पडल्यास शॉर्टसर्किट होऊन आग लागण्याच्या आणि मालमत्तेचे नुकसान होण्याच्या घटनाही घडतात. विशेषतः पशू-पक्ष्यांच्या जीविताला या मांजामुळे मोठा धोका निर्माण होऊन पर्यावरणाची हानी होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या गंभीर बाबींची दखल घेत प्रशासनाने १२ डिसेंबर २०२५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीसाठी कडक निर्बंध लागू केले आहेत. या आदेशानुसार, अहिल्यानगर शहर व जिल्ह्यात नायलॉन व चायनीज मांजाची निर्मिती, विक्री, साठवणूक आणि वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच, औद्योगिक वापरासाठी असलेला नायलॉन मांजा पतंग उडविण्यासाठी जवळ बाळगणे किंवा वापरणे यावरही बंदी असेल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ आणि पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या कलम ५ अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही गिते यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

# थंडीची लाट : सुरक्षित रहा, सजग रहा!

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**



सध्या वाढलेली थंडी आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकते. विशेषतः लहान मुले, वृद्ध व्यक्ती, गर्भवती महिला आणि दीर्घकालीन आजार असणारे लोक थंडीने लवकर प्रभावित होतात. त्यामुळे योग्य खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी

हवामान, तापमान आणि थंडीच्या इशाऱ्यांवर लक्ष ठेवा आणि अधिकृत सूचनांनुसार त्वरित कृती करा, शक्य तेवढे घरात राहा,थंड वाऱ्याचा संपर्क कमी ठेवण्यासाठी अनावश्यक प्रवास टाळा, उबदार कपडे परिधान करा, एक जाड कपडा वापरण्यापेक्षा हलके, श्वसनक्षम, लोकरी कपड्यांचे अनेक थर घाला. हे शरीराचे तापमान अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रित ठेवतात शरीर कोरडे ठेवा, घाम आला किंवा कपडे भिजले तर लगेच बदला, डोके, कान, हात आणि पाय झाकणे अत्यंत गरजेचे, कारण उष्णता सर्वाधिक या भागांतून निघून जाते. हातमोजे वापरा, मिटन प्रकारचे हातमोजे बोटांना एकत्र उष्णता मिळवून देतात, त्यामुळे हात जास्त उबदार राहतात.

टोपी, मफलर आणि उबदार बूट, टोपी घातल्याने शरीरातील ३० टक्के उष्णता टिकून राहते. जलरोधक आणि उष्णतारोधक पादत्राणे वापरा, शरीराची उष्णता टिकवण्यासाठी गरम अन्न, सूप, व्हिटॅमिन-सी युक्त फळे खात राहा. गरम पाणी, सूप, चहा यामुळे शरीरातील उष्णता संतुलित राहते.

त्वचा कोरडी पडू नये म्हणून तेल, पेट्रोलियम जेली, बॉडी क्रीम लावा. वृद्ध आणि लहान मुलांची विशेष काळजीसाठी त्यांच्या आरोग्याविषयी नियमित विचारपूस करा. एकटे राहणाऱ्या वृद्ध व्यक्तींना विशेष मदत करा. हुडहुडी भरल्यास लगेच उपाय,ही हायपोथर्मियाची प्राथमिक सूचना असते. त्वरित उबदार ठिकाणी जा. वैद्यकीय मदत

हिमबाधा किंवा हायपोथर्मियाची लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांकडे जा.पाळीव प्राणी आणि गुरांना उबदार निवाऱ्याची व्यवस्था करा. हिवाळ्यात थंडीची लाट गंभीर आरोग्य संकट निर्माण करू शकते. मात्र योग्य खबरदारी, वेळेवर केलेली काळजी आणि सजगता यामुळे आपण व आपल्या कुटुंबाचे संरक्षण करू शकतो त्यासाठी सुरक्षित राहा, उबदार राहा आणि इतरांना देखील जागरूक करा.











